१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | सोमवार | दि. ७ सप्टेंबर २०२६ | अंक ९३ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



छायाचित्र : समीर मालोदे

■ पुरुषांत मरीआई मेटपाडा, महिलांत भोनंग पथक अव्वल

२४ वर्षांच्या इतिहासात नऊ थरांची विक्रमी सलामी

## विक्रमांचे थर

### अलिबागमध्ये ‘मानाच्या दहीहंडी’त

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिद्द असावी तर अशी..! एक.. दोन नव्हे तर, तब्बल २१ वर्षांची मेहनत... डोक्यावर एकावर एक रचलेले नऊ थर... क्षणाक्षणाला वाढणारा तणाव... हजारो प्रेक्षकांचा कडकडाट आणि ‘गोविंदा आला रे’च्या जयघोषात पहाटे ३ वाजून २६ मिनिटांनी मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाने सात थरांवर दहीहंडी फोडत अलिबागच्या दहीहंडी इतिहासात नवा विक्रम प्रस्थापित केला. त्याआधी तब्बल नऊ थरांची विक्रमी सलामी देत या पथकाने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. रायगडमध्ये प्रथमच नऊ थरांची सलामी देण्याचा मान मरीआई मेटपाडाने पटकावला. पुरुष गटात मरीआई मेटपाडा, तर महिला गटात भोनंग महिला गोविंदा पथकाने प्रथम क्रमांक पटकावत विजयाची मोहोर उमटवली.

शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक आघाडी पुरस्कृत आणि प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित ‘मानाची दहीहंडी उत्सव २०२६’ मोठ्या उत्साहात पार पडला. २४ वर्षांची परंपरा असलेल्या या उत्सवात यंदा नऊ थरांच्या विक्रमी सलामीने दहीहंडीचा थरार आणखी उंचावला. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली चुरस पहाटेपर्यंत कायम राहिली.

मानाच्या दहीहंडीच्या पुरुष गटात मरीआई मेटपाडा पथकाने •➤पान २ वर



**अन् रोखले गेले श्वास...!**

*अलिबागेत उपस्थित असणाऱ्या हजारो प्रेक्षकांनी हा थरार अनुभवला. ‘गोविंदा’च्या गजरात एक... दोन... तीन... म्हणत प्रत्येक थर उंचावत गेला. आठवा थर चढताना प्रेक्षकांचा श्वास रोखला गेला आणि नववा थर पूर्ण होताच जल्लोषाच्या आरोळ्या दुमदुमल्या. गोविंदा पथकांचे खरे किंग आम्हीच, असा दमदार संदेश या थरारक कामगिरीत मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाने दिला.*

## पनवेलमध्ये दहीहंडी उत्सवाला गालबोट

### सहा ते सात गोविंदांसह मुलीलाही विजेचा धक्का

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील लाईन आळी परिसरात शिवसेना शाखेजवळ शनिवारी सायंकाळी पारंपरिक दहीहंडी उत्सवाला गालबोट लागले. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांचा थर रचला जात असतानाच अचानक विद्युत प्रवाहाचा धक्का बसल्याने सहा ते सात गोविंदांना विजेचा झटका बसल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये एका मुलीचाही समावेश असल्याची प्राथमिक माहिती आहे. सुदैवाने सर्वांची प्रकृती स्थिर असून, वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना घरी सोडण्यात आले.



लाईन आळी परिसरातील नवनाथ पंथी स्थानात पिढ्यानपिढ्या पारंपरिक पद्धतीने दहीहंडी साजरी केली जाते. यंदाही मोठ्या उत्साहात दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदांचा थर रचण्यात येत होता. उत्सवाचा जल्लोष सुरू असतानाच अचानक काही गोविंदांना विद्युत प्रवाहाचा धक्का बसला. क्षणार्धात उत्सवस्थळी एकच गोंधळ उडाला.

प्राथमिक माहितीनुसार, परिसरात साचलेल्या अथवा वाहणाऱ्या पाण्यामुळे विद्युत खांबाला बांधलेल्या तारेमध्ये विद्युत प्रवाह उतरल्याचा अंदाज •➤पान २ वर

## तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

| खोपोली | प्रतिनिधी |

सर्वत्र दहीहंडी उत्सवाची धामधुम सुरू असताना अचानक खालापूर तालुक्यातील ग्रामीण बीडखुर्द गावावर शोककळा पसरली असून, या गावातील १८ वर्षीय साहिल दीपक बडेकर या तरुणाचा गावाशेजारील तलावात बुडून मृत्यू झाल्याने सर्वांनी हळहळ व्यक्त केली.

दहीहंडी उत्सव म्हटला की, गाव खेड्यात या उत्सवाची मोठी धामधूम असते. गाव खेड्यातील तरुण घरोघरी जात रिंगण धरत गोपाळकाला उत्सवाचा आनंद उत्सव साजरा केल्यानंतर गावाशेजारी असणाऱ्या तलाव, विहीर किंवा अन्य ठिकाणी जात पावसामध्ये भिजत मौजमजा करत असतात. मात्र, •➤पान २ वर

## टोरंटच्या मशिनरीमुळे वाट बिकट

■ भालिवडी-आंबोट रस्त्याची दुरवस्था

■ शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खालाटी येथील प्रस्तावित टोरंट पॉवरच्या ३ हजार मेगावॅट उदंचन जलविद्युत प्रकल्पावरून संघर्षाची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रकल्पासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असतानाच टोरंटची अवजड मशिनरी भालिवडी परिसरात दाखल झाल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. प्रकल्पाला शासनाची अंतिम मंजुरी नसताना मशिनरी आलीच कशी, असा सवाल उपस्थित होत आहे.



साई डोंगर प्रकल्पासाठी भालिवडी ते साई डोंगर असा ५.९१ किलोमीटरचा रस्ता प्रस्तावित असून, त्यासाठी ३९० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. •➤पान २ वर

## तरुणाचा अपघाती मृत्यू

| रेवदंडा | प्रतिनिधी |

पत्नीला रोहा येथून घरी आणण्यासाठी मोटारसायकलवरून निघालेल्या ३२ वर्षीय तरुणाचा समोरून आलेल्या भरधाव बुलेट मोटारसायकलशी झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सुडकोली गावाच्या हद्दीत अलिबाग-रोहा मार्गावर घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिकेत अशोक भगत (३२, रा. उमटे, पो. रामराज, ता. अलिबाग) हे पत्नीला रोहा येथून घरी आणण्यासाठी त्यांच्या मोटारसायकलवरून अलिबाग-रोहा मार्गाने जात होते. सुडकोली परिसरात ते आले असता रोहा बाजूकडून अलिबागच्या •➤पान २ वर

## दिल्लीत पाच मजली इमारत कोसळली



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

दक्षिण-पश्चिम दिल्लीतील सत्य निकेतनजवळ पाचन मजली इमारत कोसळल्याची घटना रविवारी दुपारी घडली. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून, तिघे गंभीर जखमी झाले आहेत. तर, अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या घटनेमुळं सत्य निकेतन परिसरात घबराट पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अग्निशमन दलाला दुपारी दीड वाजता माहिती मिळाली. अग्निशमन दलाची पथकं आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, सध्या बचावकार्य सुरू आहे.

ही घटना मोती बाग येथील सत्य निकेतनमधील शिव मंदिराच्या जवळ घडली.

## दिवेआगर समुद्रात बुडणाऱ्या तीन पर्यटकांना जीवदान

| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर समुद्रकिनारी खोल पाण्यात बुडू लागलेल्या पुण्याच्या तीन पर्यटकांना स्थानिक कोळी बांधवांनी प्रसंगावधान राखत जीवदान दिले. शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास गणपती विसर्जन पॉइंट येथे ही घटना घडली.

पुण्याहून पर्यटनासाठी आलेले आदित्य भिसे, अभिषेक साळवे, भूमी बोऱ्हाडे, शबिल शेख, अभिषेक जॉर्ज आणि तन्वी जगताप हे समुद्रात पोहत असताना अभिषेक साळवे (२३), भूमी बोऱ्हाडे (२१) आणि आदित्य संदीप भिसे (२४) यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्यात ओढले गेले. मोठ्या लाटांमुळे तिघेही बुडू लागल्याने घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

मदतीसाठी पर्यटकांचा आवाज ऐकून पोर्ट केबिन, विसर्जन पॉइंट येथे कर्तव्यावर असलेले होमगार्ड रेवाळे यांनी तातडीने मदतीचे आवाहन केले. त्यानंतर दिवेआगर येथील कोळी बांधव प्रणय चोगले, विघ्नेश चोगले, योगेश चोगले आणि विष्णुदास चोगले यांच्यासह ग्रामस्थांनी धाव घेतली. जेट स्कीच्या सहाय्याने धाडसी बचावकार्य करत तिघांनाही सुखरूप समुद्राबाहेर •➤पान २ वर

## तळोजात सहा जनावरे बेशुद्धावस्थेत


| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा गावाजवळ पनवेल-मुंबई महामार्गालगत जामा मशिदीसमोर सिडकोच्या भूखंडावर सहा गोवंशीय जनावरे दयनीय व बेशुद्धावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस नाईक रत्नाकर बबनराव पाटील यांच्या तक्रारीनुसार, गस्तीवर असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. त्यावेळी चार बैल आणि दोन गायी आढळून आल्या.

यातील एका बैलासह दोन गायींना इंजेक्शन देऊन बेशुद्ध करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या शिंगांना, गळ्याला तसेच तोंडाला नायलॉनच्या दोऱ्या बांधून त्यांना झाडांना बांधून ठेवण्यात आले होते. उर्वरित जनावरेही दयनीय अवस्थेत असल्याचे पोलिसांच्या •➤पान २ वर



# बीकेसीच्या धर्तीवर नवे आर्थिक केंद्र

## ■ आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कच्या विकासासाठी सिडकोची निविदा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कार्यान्वयनानंतर परिसराच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सिडकोने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खारघर येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कच्या विकासासाठी खासगी विकासकाची निवड करण्याची निविदा प्रक्रिया सिडकोने सुरू केली आहे. त्यामुळे खारघर-पनवेल परिसरात भविष्यात मोठे व्यावसायिक केंद्र आकाराला येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सिडकोच्या अधिकृत माहितीनुसार, खारघर येथे सुमारे

**■ विमानतळामुळे पनवेल-नवी मुंबईच्या आर्थिक विकासाला नवी दिशा**

१४० हेक्टर क्षेत्रावर कॉर्पोरेट पार्क विकसित करण्याची योजना आहे. हा परिसर प्रामुख्याने वाणिज्यिक आणि अंशतः निवासी वापराचे आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्याची संकल्पना आहे. प्रस्तावित कॉर्पोरेट पार्क नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ असून, परिसरात शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल, सेंट्रल पार्क आणि गोल्फ कोर्स यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

या प्रकल्पामुळे नवी मुंबईला मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलाप्रमाणे मोठे व्यावसायिक केंद्र मिळण्याची शक्यता आहे. २०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या निविदेनुसार प्रकल्पाचा विकास खासगी भागीदारीतून करण्याची प्रक्रिया आखण्यात आली असून विकासकाची निवड स्पर्धात्मक निविदेद्वारे केली जाणार आहे.

**विमानतळामुळे व्यावसायिक नकाशा बदलणार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या संपूर्ण पट्ट्याचे महत्त्व वाढले आहे. विमानतळ, अटल सेतू, जेएनपीए आणि प्रस्तावित विविध वाहतूक प्रकल्प यामुळे खारघर-पनवेल परिसराला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवसायासाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. याचबरोबर विमानतळ प्रभावक्षेत्रातील नैना प्रकल्पात रोजगार, शिक्षण, आरोग्य तसेच पर्यावरण-पर्यटन आणि मनोरंजनाशी संबंधित विकासाला चालना देण्याचे नियोजन असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या माहितीत नमूद आहे.

**लॉजिस्टिक्सलाही मोठी चालना**

विमानतळ आणि जेएनपीए यांच्या जवळीकतेमुळे या परिसरात लॉजिस्टिक्स आणि मालवाहतूक क्षेत्रालाही मोठी संधी निर्माण होत आहे. नवी मुंबई परिसराला आंतरराष्ट्रीय दर्जाचे लॉजिस्टिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या व्यापक नियोजनात विमानतळ आणि बंदर जोडणीला महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळात विमानतळबंदरअटल सेतूकॉर्पोरेट पार्क या चौकटीत पनवेल आणि नवी मुंबईचा आर्थिक विकास वेगाने होण्याची शक्यता आहे. खारघरमधील आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कची निविदा प्रक्रिया ही या बदलाची सुरुवात मानली जात आहे.

## वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यांवर कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांविरोधात रायगड पोलिसांनी धडक कारवाई केली. ५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

दिवसभरात वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १८८ जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. संबंधितांकडून तब्बल १ लाख ६५ हजार ७५० रुपयांचा दंड आकारण्यात आला. वाहतुकीचे नियम पाळावेत, वाहन चालविताना निष्काळजीपणा टाळावा आणि रस्त्यावर इतरांच्या सुरक्षिततेचा विचार करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## दारूच्या नशेत कार चालवून अपघात

### चालकासह दोघांवर गुन्हा दाखल

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

दारूचे सेवन करून भरधाव कार चालविताना नियंत्रण सुटल्याने उभ्या कारला धडक देत अपघात केल्याची घटना ४ सप्टेंबर रोजी रात्री ९.२० वाजण्याच्या सुमारास खोपोलीतील शास्त्रीनगर येथे घडली. अपघातानंतर कारच्या नुकसानीबाबत विचारणा केली असता चालकासह त्याच्या साथीदाराने फिर्यादीला शिवीगाळ करून दमदाटी केल्याचा प्रकारही समोर आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चालक हा आपल्या ताब्यातील मारुती सुझुकी स्विफ्ट कार क्रमांक एमएच ४६ सीआर ७०८५ ही आयडीबीआय बँक, खोपोली ते शास्त्रीनगर मार्गावर निष्काळजीपणे व धोकादायक वेगाने चालवत होता. नियंत्रण सुटल्याने कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एमएच ४६ बीके ४६२३ क्रमांकाच्या कारच्या मागील उजव्या बाजूस धडक दिली. या अपघातामुळे उभ्या कारचे नुकसान झाले. त्याबाबत विचारणा केली असता आरोपी चालक व त्याच्या साथीदाराने संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ करत दमदाटी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिलेवर कोयत्याने हल्ल्याचा प्रयत्न

**। पेण । प्रतिनिधी ।**

दारूच्या नशेत हातात कोयता घेऊन महिलेच्या घरात घुसून शिवीगाळ, मारहाण करण्याचा प्रयत्न तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास श्रीरामनगर, फणसडोंगरी, पेण येथे घडली. फिर्यादी महिला घरी असताना तिचा ओळखीचा मित्र आरोपी हा दारूच्या नशेत हातात कोयता घेऊन घरात घुसला. त्याने महिलेला तिच्या हालचालींबाबत जाब विचारत शिवीगाळ केली. कोयता घेऊन मारण्यासाठी अंगावर येत असताना महिलेने विरोध केला. त्यानंतर आरोपीने दगड फेकून मारल्याने तो महिलेच्या कानाजवळ लागून दुखापत झाली. यानंतर आरोपीने हातातील कोयत्याने महिलेच्या मुलाच्या मोटारसायकलवर वार करून तिचे नुकसान केले. तसेच महिलेच्या मुलीबाबत विचारणा करत शिवीगाळ केली.

## विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

फार्महाऊसमधील स्विमिंग पूलजवळील लोखंडी खांबाला विद्युत प्रवाह सुरू असल्याने विजेचा धक्का लागून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना २५ जुलै रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास बोरगाव येथील आर.जे. फार्महाऊसमध्ये घडली. या घटनेमुळे परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मयत व्यक्ती आपल्या इमारतीतील १८ मित्रांसह सहलीसाठी बोरगाव येथील फार्महाऊसमध्ये गेली होती. मित्रांसोबत व्हॉलीबॉल खेळत असताना चेंडू स्विमिंग पूलच्या बाहेर गेला. चेंडू शोधण्यासाठी हातात लाकडी बॅट घेऊन जात असताना त्याचा पाय लोखंडी खांबाला लागला.

या खांबातून विद्युत प्रवाह सुरू असल्याने त्याला विजेचा जोरदार धक्का बसला आणि तो जागीच कोसळला.

मित्रांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पायाला विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याचे नमूद केले.

या घटनेच्या चौकशीत फार्महाऊसचा व्यवस्थापक व केअरटेकर यांच्यावर पर्यटकांच्या सुरक्षेची जबाबदारी असतानाही विद्युत सुरक्षेबाबत योग्य खबरदारी न घेतल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक निशिंगटे अधिक तपास करीत आहेत.

## पतीकडून पत्नीला बेदम मारहाण

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

घरात मुलासोबत जेवायला बसलेल्या पत्नीला विनाकारण शिवीगाळ व दमदाटी करून लोखंडी शिगेने मारहाण केल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास कपाडिया मार्केट, माथेरान येथे घडली.

फिर्यादी महिला आणि आरोपी हे पती-पत्नी आहेत. महिला आपल्या मुलासोबत जेवायला बसली असताना आरोपीने तिच्याशी वाद घालत शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लोखंडी शिगेने तिच्या पाठीवर आणि उजव्या हातावर मारहाण केली. या मारहाणीत तिच्या हाताला फ्रॅक्चर होऊन दुखापत झाली.

याप्रकरणी माथेरान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोहवा अशोक ओंकार राठोड अधिक तपास करीत आहेत.

## घावरी नदीत सोडले गाळमिश्रित पाणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरातील शार्लोट तलावातील गाळमिश्रित पाणी घावरी नदीत सोडल्याने नवी मुंबई महानगरपालिकेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पावसाळ्यात तलावातील पाणी किंवा गाळ नदीपात्रात सोडू नये, असे निर्देश देऊनही माथेरान नगरपरिषदेकडून ही कार्यवाही करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे मोरबे धरणाच्या जलसाठ्याला धोका निर्माण झाल्यास तसेच आर्थिक नुकसान झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशारा नवी मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिला आहे.

माथेरान नगरपरिषदेच्या अमृत-२.० अभियानांतर्गत शार्लोट तलावाचे सुशोभीकरण व जलस्रोत विकासाचे काम सुरू आहे. या कामातून निघणारा गाळ घावरी नदीत सोडण्याची कार्यवाही करण्यात



**■ नवी मुंबई महापालिकेकडून संताप व्यक्त**

**■ माथेरान नगरपरिषदेवर कारवाईचा इशारा**

आल्याचे नवी मुंबई महापालिकेच्या निदर्शनास आले आहे. १० ऑगस्ट रोजी मोठ्या प्रमाणात गाळमिश्रित पाणी नदीपात्रात सोडण्यात आल्याची माहिती आहे.

घावरी नदी ही मोरबे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात येणारी महत्त्वाची नदी आहे. मोरबे धरणातून नवी मुंबईसह परिसरातील २५ लाखांहून अधिक नागरिकांना पिण्याचा पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे गाळ नदीपात्रात सोडल्यास तो धरणाच्या जलाशयात साचून जलसाठ्याची क्षमता कमी होणे, पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होणे तसेच भविष्यात गाळ काढण्यासाठी मोठा आर्थिक भार पडण्याची शक्यता महापालिकेने व्यक्त केली आहे.

**पर्यावरणप्रेमी संस्थेने वेधले लक्ष**

'पर्यावरण संवेदनशील नागरिक प्रतिष्ठान, माथेरान' या संस्थेने या प्रकाराबाबत नवी मुंबई महानगरपालिकेचे लक्ष वेधले होते. त्यानंतर महापालिकेने माथेरान नगरपरिषदेला गाळ नदीपात्रात अथवा मोरबे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सोडण्यास प्रतिबंध करण्याचे निर्देश दिले होते. मोरबे धरण हा नवी मुंबईच्या पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत असल्याने जलस्रोताचे संरक्षण आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन प्रकरणाची तातडीने पडताळणी करावी, असे निर्देश महापालिका आयुक्तांनी पाणीपुरवठा विभागाला दिले आहेत. त्यामुळे आता माथेरान नगरपरिषदेच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हरेश दळवींचा जामीन अर्ज नामंजूर

**। पेण । प्रतिनिधी ।**

उद्योजक मयूर वनगे मारहाण व पिस्तोलचा धाक आणि चोरी प्रकरणातील आरोपी क्रमांक २ हरेश कृष्णा दळवी यांनी जामिनासाठी जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केलेला अर्ज न्यायालयाने नामंजूर केला आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींच्या अडचणी वाढल्या असून, हरेश दळवी यांना आता जामिनासाठी उच्च न्यायालयात दाद मागावी लागण्याची शक्यता आहे.

हरेश कृष्णा दळवी यांच्याविरुद्ध सीआर क्रमांक ८५/२०१७ अन्वये भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४ व ३४ अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचे पोलिसांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. मयूर वनगे यांच्या गळ्यातील सुमारे पाच तोळ्यांची सोन्याची चैन काढल्याचा तसेच त्यांच्या पाठीवर, मांडीवर आणि पायाच्या तळव्यांवर मारहाण केल्याचा आरोप हरेश दळवी यांच्यावर



असल्याचे पोलिसांनी न्यायालयात मांडले.

जामीन अर्जाच्या सुनावणीदरम्यान पोलिसांनी प्रकरणातील विविध बाबी व आरोप न्यायालयासमोर मांडले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा सत्र न्यायालयाने हरेश कृष्णा दळवी यांचा जामीन अर्ज नामंजूर केला.

हरेश दळवी यांचा जामीन अर्ज नामंजूर झाल्यामुळे या प्रकरणातील अन्य आरोपी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दळवी आणि रुपेश दळवी यांच्या अडचणीही वाढल्याची चर्चा आहे. दरम्यान, हरेश दळवी यांना जामीन मिळवायचा असल्यास आता उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज करावा लागणार आहे.

या प्रकरणातील आरोपांबाबत अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार असून, सध्या संबंधित आरोपींवरील आरोप हे न्यायालयीन विचाराधीन आहेत.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे तुरमाळे, तालुका-पनवेल, जि.रायगड येथील श्री. गोपाळ जुगलकिशोर बरासीया व सौ. सुनिता गोपाळ बरासीया यांच्या मालकी हक्कांची व त्यांचे ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली मिळकत आमचे आशिल कायमस्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-तुरमाळे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नाव | सर्व्हे/गट/हिस्सा नं. | क्षेत्र आर चौ.मी | आकार |
|---|---|---|---|
| १) श्री.गोपाळ जुगलकिशोर बरासीया | २७/३/ब | ७५.६०.०० (बिनशेती) | ७५६ |
| २) सौ.सुनिता गोपाळ बरासीया | २७/३/अ/१ | ०.४०.०० | ८.०० |

सदरहू जागा, जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कूळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडुन दिली आहे असे गृहित धरुन आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण- पनवेल
दिनांक - /०९/२०२६

सही/-
**ॲड. चेतन भास्कर जाधव**
पत्ता- फ्लॅट क्र. ०२ पुष्कर सो.
प्रांत ऑफिस जवळ, ठाणा नाका रोड,
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६
मोबाईल क्रमांक- ९८९२७३९११५

संमती
१) श्री. गोपाळ जुगलकिशोर बरासीया
२) सौ. सुनिता गोपाळ बरासीया
यांच्या वतीने सही करणार रविंद्र श्रावण चोरघे

पान १ वरून

## अलिबागमध्ये 'मानाच्या दहीहंडी'त विक्रमांचे थर

सात थर रचत दहीहंडी फोडली. विजेत्या पथकाला २ लाख ५१ हजार रुपये आणि मानाचा चषक देऊन गौरविण्यात आले. महिला गटात भोनंग महिला गोविंदा पथकाने प्रथम क्रमांक पटकावत १ लाख १ हजार रुपये आणि मानाचा चषक मिळवला.

नऊ थरांची विक्रमी सलामी दिल्याबद्दल मरीआई मेटपाडा पथकाला प्रशांत नाईक यांच्या वतीने एक लाख रुपयांचे विशेष पारितोषिक देण्यात आले. आठ थर रचणाऱ्या कोळीवाडा गोविंदा पथकाला ५० हजार, तर सहा थर रचणाऱ्या पोहरादेवी-शास्त्रीनगर महिला पथकाला २१ हजार रुपयांचे विशेष पारितोषिक देण्यात आले.

पहाटे ३ वाजून २६ मिनिटांनी मरीआई मेटपाडा पथकाने सात थरांवर दहीहंडी फोडताच परिसर टाळ्यांच्या कडकडाटाने आणि गोविंदांच्या घोषणांनी दुमदुमून गेला. नऊ थरांची विक्रमी सलामी आणि त्यानंतर सात थरांवर दहीहंडी फोडण्याचा थरार यंदाच्या उत्सवाचा अविस्मरणीय क्षण ठरला.

दहीहंडी फुटल्यानंतर आयोजक प्रशांत नाईक यांनी विजेत्या पथकांसह सर्व सहभागी गोविंदा पथकांचे अभिनंदन केले. नऊ थरांची विक्रमी सलामी देणाऱ्या मरीआई मेटपाडा पथकाचे विशेष कौतुक करत त्यांनी गोविंदांच्या मेहनतीला, धाडसाला आणि एकजुटीला दाद दिली. महिला गटातील विजेत्या भोनंग पथकाचेही त्यांनी अभिनंदन केले. यावेळी गोविंदा, कार्यकर्ते आणि उपस्थितांनी प्रशांत नाईक यांच्यासोबत जल्लोष करत विजयाचा आनंद साजरा केला.

यावेळी रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्यासह शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य महिला आघाडी प्रमुख तथा उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगराध्यक्षा अक्षया नाईक, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, अलिबाग नगरपरिषदेचे पाणी पुरवठा सभापती अनिल चोपडा, महिला व बालकल्याण सभापती डॉ. साक्षी पाटील, उपसभापती ॲड. अश्विनी ठोसर, वृषाली ठोसर, ॲड. निलम हजारे, संजना कीर, संतोष गुरव, संध्या पालवणकर, ॲड. निवेदिता वाघमारे, प्रिया वेलणकर, अजय झुंजारराव, युवराज पाटील, प्रीती झुंझारराव योजना पाटील, जमाल सय्यद, ऋषिकेश माळी, अवधूत पाटील, नागेश कुलकर्णी, सतीश प्रधान, सर्व आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रशांत नाईक मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

२४ वर्षांची परंपरा, २००५ पासूनची थरांची जिद्द आणि अखेर रायगडमध्ये नऊ थरांची विक्रमी सलामी देत मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाने यंदाची 'मानाची दहीहंडी' अक्षरशः गाजवून सोडली. पुरुषांबरोबरच महिला गोविंदा पथकांचा दमदार सहभाग यामुळे प्रशांत नाईक मित्रमंडळाची २४ वर्षांची 'मानाची दहीहंडी' यंदा विशेष ठरली.

**२००५ पासून थरांचा थरार!**

मरीआई गोविंदा पथकाची स्थापना २००५ मध्ये झाली. सुरुवातीला अवघ्या ७० ते ८० गोविंदांसह सुरू झालेल्या या पथकाने त्याच वर्षी तीन एक्के लावत सात थर रचले. २०१२ मध्ये माजगाव ताडवाडी आणि जय जवान गोविंदा पथकानंतर चार एक्के लावत देशात तिसरा मान पटकावण्याची कामगिरीही पथकाने केली. त्यानंतर सात थरांची परंपरा सातत्याने कायम ठेवत पथकाने आपली ओळख अधिक भक्कम केली. २०२४ मध्ये प्रथमच आठ थरांचा प्रयत्न झाला; मात्र तो अपयशी ठरला. त्यानंतर जिद्द न सोडता २०२५ मध्ये कर्मभूमीवर प्रथमच आठ थर यशस्वीपणे रचून उतरवण्यात आले. त्याच वर्षी दहीहंडीच्या दिवशी तब्बल तीन वेळा आठ थर रचून सुखरूप उतरणारे रायगड जिल्ह्यातील एकमेव पथक ठरण्याचा मानही मरीआई मेटपाडाने मिळवला. २०२६ मध्ये पथकाने विविध ठिकाणी तब्बल ५० ते ५५ वेळा सात थर, तर ८ ते १० वेळा आठ थर यशस्वीपणे रचून उतरवले. अखेर २ सप्टेंबर २०२६ रोजी दक्षिण कोकण विभागातील पहिले नऊ थर रचून या पथकाने आपल्या कामगिरीला नवे शिखर गाठले.

**८० गोविंदांपासून ३०० पर्यंतचा प्रवास**

मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाचा विस्तार आता केवळ मेटपाड्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. पथकातील खेळाडूंची संख्या तब्बल २५० ते ३०० पर्यंत पोहोचली आहे. सिद्धार्थनगर, शास्त्रीनगर, अलिबाग कोळीवाडा, वरसोली कोळीवाडा, रामनाथ, चालमाला, कुरूळ, नागाव, चौल, वायशेत, मानी भुते यांसह अलिबाग शहरातील विविध भागांतून तरुण या पथकात सहभागी होत आहेत.

## तरुणाचा अपघाती मृत्यू

दिशेने येणाऱ्या बुलेट मोटारसायकल क्रमांक एमएच-०६-जीटी-००२७ ने त्यांच्या मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की, अनिकेत भगत यांच्या डोक्याला व चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. गंभीर दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. अपघातात दोन्ही मोटारसायकलींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, बुलेटस्वारालाही लहान-मोठ्या दुखापती झाल्या आहेत.

याप्रकरणी अमित पोपटराव जाधव (३६, रा. फणसापूर, ता. अलिबाग, जि. रायगड) यांच्याविरुद्ध रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आली आहे. या घटनेची फिर्याद अशोक चांगू भगत (६३, रा. उमटे, पो. रामराज) यांनी दिली असून, ५ सप्टेंबर रोजी रात्री ९.५४ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक म्हशीलकर करीत आहेत.

## तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

हीच मौजमजा खालापूर तालुक्यातील बीडखुर्द गावातील तरुणावर बेतली असून, त्याचा तलावामध्ये बुडून मृत्यू झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीडखुर्द गावातील साहिल दीपक बडेकर हा तरुण मित्रांसोबत गावाशेजारी असणाऱ्या तलावात पोहण्यासाठी गेला असता तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडाला. याबाबतची माहिती समजतात ग्रामस्थांनी तलावाकडे धाव घेतली असता साहिलला बाहेर काढले, मात्र तो त्यावेळी अस्तवस्थ असल्याने त्याला खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केल्यानंतर अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे. साहिलच्या निधनाची माहिती समजताच बीडखुर्द गावासह संपूर्ण खालापूर तालुक्यात शोककळा पसरली आहे.

## टोरंटच्या मशिनरीमुळे वाट बिकट

मात्र, शेतकऱ्यांनी या रस्त्याला विरोध केला असून भूसंपादन अधिकाऱ्यांकडे तक्रारीही दाखल केल्या आहेत. काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी जमिनीची मोजणी करण्यासही विरोध केला होता.

असे असतानाच रस्ता तयार करण्यासाठी आणि खोदकामासाठी अवजड मशिनरी परिसरात आणण्यात आली आहे. या मशिनरीच्या वाहतुकीमुळे भालिवडी-आंबोट रस्त्याची दुरवस्था सुरू झाली आहे. शेतकऱ्यांचा विरोध आणि मंजुरीचा प्रश्न कायम असताना कंपनीने मशिनरी आणण्याची घाई का केली, असा संतप्त सवाल पर्यावरण बचाव समिती व ग्रामस्थांनी केला आहे.

शेतकऱ्यांचा विरोध डावलून काम सुरू करण्याचा प्रयत्न झाल्यास परिसरात संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे.

## पनवेलमध्ये दहीहंडी उत्सवाला गालबोट

व्यक्त केला जात आहे. याच ठिकाणी गोविंदांचा थर रचला जात असताना हा प्रकार घडल्याने मोठा अनर्थ होण्याची शक्यता होती. मात्र, सुदैवाने परिस्थिती नियंत्रणात आली.

घटनेनंतर विद्युत धक्का बसलेल्या गोविंदांना तातडीने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार, सर्वांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही. तपासणीनंतर सर्वांना घरी सोडण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत विद्युत पुरवठा खंडित केला. त्यामुळे पुढील संभाव्य दुर्घटना टळली. सार्वजनिक उत्सवाच्या ठिकाणी विद्युत तारा, खांब आणि पाण्याचा संपर्क याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात आली होती का, असा गंभीर प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाला आहे.

प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन विद्युत सुरक्षेची पाहणी, घटनेचे नेमके कारण आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी सखोल चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## तळोजात सहा जनावरे बेशुद्धावस्थेत

निदर्शनास आले. जनावरांना अशा प्रकारे बेशुद्ध करून बांधून ठेवण्यामागील नेमका उद्देश काय, याचा तपास तळोजा पोलिसांकडून सुरू आहे. घटनास्थळी आढळलेल्या जनावरांबाबत पोलिसांनी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून, या प्रकारामागे कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे.

## दिवेआगर समुद्रात बुडणाऱ्या तीन पर्यटकांना जीवदान

काढण्यात आले.

पाण्यात बुडाल्याने तिघांच्या नाका-तोंडात पाणी गेल्याने त्यांना तातडीने बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर तिघांचीही प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांनी रुग्णालयात जाऊन पर्यटकांची भेट घेतली व त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. समुद्रात उतरताना पाण्याची खोली, लाटांचा वेग आणि समुद्राची स्थिती लक्षात घ्यावी तसेच जीवरक्षक व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

वेळीच मदतीला धावलेल्या कोळी बांधवांच्या प्रसंगावधानामुळे तीन पर्यटकांचे प्राण वाचले. त्यांच्या धाडसी आणि तत्पर बचावकार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दिवेआगर समुद्रकिनारी वाढती पर्यटकांची गर्दी लक्षात घेता जीवरक्षक, बचाव साधने आणि आपत्कालीन यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज या घटनेने पुन्हा अधोरेखित केली आहे.

**जाहीर नोटीस** दिनांक ०४/०९/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे साळोख त. नीड आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. रविंद्र पांडूरंग कदम वगैरे | १८/४ | ०-२७-१० | ४-८१ |
| श्री. रविंद्र पांडूरंग कदम वगैरे | १७/३ | ०-१९-५० | ३-४४ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे आर्ढे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| सौ. रतन सखाराम भोईर<br>सौ. रेणुका भालचंद्र थेटे. | ९८/२ | ००-२८-६०<br>पो.ख. ००-०२-३०<br>एकुण-००-३०-९० | ४-३१ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोत , चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०७/०९/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## अलिबागच्या मानाच्या दहीहंडीतील जल्लोष








# राघोबा देव गोविंदा पथकाने फोडली हंडी

## यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे दहीहंडी उत्सव; ५,५५,५०० रुपयांची बक्षिसे

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

शेलघर येथील यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे दहीहंडी उत्सव दणक्यात साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक- अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत, सचिव शुभांगी घरत यावेळी हजर होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून अभिनेत्री सायली संजीव यांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

गोविंदा पथकांच्या उत्साहाला रिमझीम पावसाच्या सरींनी साथ दिली, त्यामुळे त्यांचा आनंद द्विगुणित झाला. थरांथर रचताना गोविंदा पथकांची चिकाटी आणि एकी दृष्ट लागण्याजोगी होती. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उरण, पनवेल आदी ठिकाणांहून सुमारे ६० गोविंदा पथकांनी सलामी दिली.





कुणी चार थर, कुणी पाच, सहा, सात, आठ थरांपर्यंत मजल मारली. भारतीय महिला क्रिकेट संघाने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळविला, तर दहीहंडी उत्सवात महिलांच्या गोविंदा पथकांची सलामी वाखाणण्याजोगी होती. सोबत शिवमुद्रा डान्स अकॅडमी पपण पाटील यांच्या नृत्याचा आविष्कार होता. अनेक नृत्यांगणांनी गोविंदा पथकांना आणि रसिकांना खिळवून ठेवले.

पहिला क्रमांक राघोबा देव गोविंदा पथक कोटनाका, उरण; द्वितीय क्रमांक जरीमरी आई गोविंदा पथक, पिरकोन आणि आम्ही तुर्भे कर गोविंदा पथक, तुर्भे यांनी तिसऱ्या क्रमांकावर बाजी मारली. यावेळी सायली संजीव म्हणाल्या, सर्व गोविंदा पथकांचे अभिनंदन आणि कौतुक करते, गोविंदा पथकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. महेंद्र घरत यांच्यासारखे दिलदार नेतृत्व या परिसराला लाभले आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. शुभांगी आणि महेंद्र घरत हे अनोखे दाम्पत्य आहे. त्यांची सामाजिक बांधिलकी वाखाणण्याजोगी आहे. आईच्या नावाने संस्था सुरू करून सर्वसामान्यांच्या आयुष्यात सुखाचे क्षण पेरण्याची त्यांची भूमिका कौतुकास्पद आहे.

यावेळी महेंद्र घरत म्हणाले, यमुना सामाजिक संस्थेतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. दहिहंडी हा त्याचाच भाग आहे, आपण संस्कृती जपण्यासाठी आणि टिकविण्यासाठी प्रयत्न करतोय; परंतु उत्सव साजरा करीत असताना कुणालाही दुखापत होऊ नये, याची काळजी घ्या. मी सदैव कलेला प्रोत्साहन देणारा आणि सन्मान करणारा आहे.

यावर्षी दहीहंडीसाठी ५ लाख ५५ हजार ५०० रुपये रोख बक्षीस आणि चषक ठेवण्यात आले होते. सायंकाळी ५ वाजता ढोल-ताशांच्या गजरात उत्सवाला सुरुवात झाली. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उरण येथील प्रसिद्ध गोविंदा पथकांनी अवघ्या काही मिनिटांत पाच-सहा-सात-आठ लावले. विजेत्यांना ५,५५,५०० रुपयांची बक्षिसे देण्यात आली.

# आठ थरांची सलामी देत विठाबाई खारपाले गोविंदा पथकाने फोडली मानाची हंडी

- **१ लाख ११ हजार १११ रुपयांचे पटकावले पारितोषिक; महिला गोविंदा पथकांचाही उत्स्फूर्त सहभाग**

**| पेण | प्रतिनिधी |**

सालाबादप्रमाणे यंदाही ललित पाटील मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पेणसह खालापूर, रोहा आणि अलिबाग तालुक्यातील सुमारे दहा पुरुष आणि दोन महिला गोविंदा पथकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

ढोल-ताशांचा गजर, गोविंदांचा उत्साह आणि थरावर थर रचत हंडी फोडण्यासाठी सुरू असलेली चुरस यामुळे परिसरात दहीहंडीचा उत्साह शिगेला पोहोचला होता. आठ थरांची रचना करत विठाबाई खारपाळे गोविंदा पथकाने मानाची हंडी फोडण्याचा मान पटकावला. विजेत्या पथकाला १ लाख ११ हजार १११ रुपयांचे रोख रक्कम व आकर्षक पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला गोविंदा पथकांनीही आपल्या दमदार कामगिरीने उपस्थितांची दाद मिळवली. रुद्रावतार महिला गोविंदा पथक, म्हैसबाड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या पथकाला आकर्षक ट्रॉफी आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महिला गोविंदांनीही पुरुष गोविंदा पथकांप्रमाणेच उत्साहाने आणि आत्मविश्वासाने सहभाग घेतल्याने स्पर्धेला वेगळे आकर्षण प्राप्त झाले.

सहा थरांची सलामी देणाऱ्या गोविंदापथकांसाठीही आयोजकांच्या वतीने विशेष रोख पारितोषिकाची व्यवस्था करण्यात आली होती. या दहीहंडी सोहळ्याला पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबत व्यासपीठावर सभापती स्मिता पेणकर, आफ्रिन आखवारे, सुनीता जोशी तसेच नगरसेविका जास्मिन पाटील, पल्लवी कालेकर, निलकंठ म्हात्रे, युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्नील म्हात्रे, अंतोरा सरपंच अमित पाटील, चंद्रकांत पाटील, क्रीडा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष रमेश पाटील, पंचायत समिती सदस्य विवेक म्हात्रे, प्रदिप म्हात्रे, उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या व सहभागी गोविंदा पथकांचे बक्षीस वितरण नगराध्यक्षा प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, सभापती व नगरसेवक यांच्या हस्ते करण्यात आले.

दहीहंडी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ललित पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष ललित पाटील, नगरसेवक अजय शिरसागर, नगरसेवक अभीराज कडू, नगरसेवक मितेश शहा, रवींद्र म्हात्रे, हितेश पाटील, राकेश म्हात्रे, अजित पाटील आणि माजी नगरसेवक संतोष पाटील, साकिब मुजावर यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या नियोजनामुळे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# आई जोगेश्वरी गोविंदा पथकाचा पालीत थरार



**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यात गेल्या ३४ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या एक गाव एक गोविंदा टॅग लाइन खाली एकत्र आलेल्या आई जोगेश्वरी गोविंदा पथकाने आपल्यातील सर्व कलाकुसर पणाला लावत, नागोठण्याजवळील पाली येथील प्रकाशभाऊ देसाई मित्रमंडळ यांच्याकडून बांधण्यात आलेल्या दोन्ही मानाच्या दही हंड्या रायगड जिल्ह्यात प्रथमच चारच्या बेसवर आठ थर लावून फोडण्याची अभिमानास्पद कामगिरी केली आहे. तसेच आठव्या थरावरील ११ वर्षीय बाल गोविंदा असलेली नागोठणे रामनगर येथील पल्लवी दत्ता पाटील हिच्या धाडसाचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

नागोठण्यातील सर्व आळींमधून तसेच शहरातील सर्वच भागातून पूर्वीपासून सुरू असलेल्या गोविंदा पथकाने एकत्र येत ३४ वर्षांपूर्वी आई जोगेश्वरी गोविंदा पथक स्थापन केले होते. नागोठण्यातील विविध आळीतील तरुणांचे गोविंदा पथक तसेच विभागातील काही तरुणांनी एकत्र येत आई जोगेश्वरी गोविंदा पथक स्थापन केले होते. या गोविंदा पथकाचे अध्यक्ष असलेले विहान जिमचे मालक भरत गिजे, प्रशिक्षक राजेश सुर्वे व रवी जासूद यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तरुण व बालगोपालांच्या सहकार्याने कसून सराव करून आई जोगेश्वरी गोविंदा पथकाने हे भव्य दिव्य यश मिळविले आहे. नागोठण्यातील आई जोगेश्वरी गोविंदा पथकाने पाली येथील शिवसेनेची रुपये ३ लाख, ३५ हजार रुपयांची मानाची दहीहंडी व भाजपा नेते प्रकाशभाऊ देसाई मित्र मंडळाची रुपये ३ लाख, ३३ हजार, ३३३ रुपयांची मानाची दहीहंडी यावरच आपले लक्ष केंद्रित करून त्या फोडण्याचा मान मिळविला. रोहा येथील मानाच्या दही हंडीला सलामी दिल्यानंतर सायंकाळी आई जोगेश्वरी गोविंदा पथक पाली येथे रवाना झाले. पाली मधील मानाच्या या दोन्ही दही हंड्या आठ थर लावून पहिल्याच प्रयत्नांत अगदी सहजपणे फोडून आई जोगेश्वरी गोविंदा पथकाने जिल्ह्यात आपल्या नाव लौकिकात भर घातली. आई जोगेश्वरी गोविंदा पथकावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पनवेलच्या लाईन आळीत 'नाथभक्ती' आणि संस्कृतीचा अनोखा संगम

# पारंपरिक 'देवांची दहीहंडी' उत्साहात साजरी

**| कळंबोली | प्रतिनिधी |**

गगनचुंबी मानवी मनोरे, डीजेंचा कानठळ्या बसवणारा आवाज आणि लाखो रुपयांची बक्षिसे अशा आधुनिक चकचकाटापासून दूर राहत, जुन्या पनवेलमधील ऐतिहासिक लाईन आळी आणि टपाल नाका परिसरात शेकडो वर्षांची परंपरा असणारा पारंपारिक दहीहंडी उत्सव अत्यंत भक्तिभावाने साजरा करण्यात आला.



पनवेलमधील या दहीहंडीला ३०० हून अधिक वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. येथील उत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे थरावर थर लावून व्यावसायिक गोविंदा पथकांकडून हंडी फोडली जात नाही. तर, नवनाथ संप्रदायाच्या परंपरेनुसार, बापट वाडा आणि लाईन आळी परिसरातील स्थानिक भाविक, विठोबा-रखुमाईचे उपासक आणि नवनाथ भक्त श्रीकृष्णाच्या भक्तीत तल्लीन होऊन हा सोहळा साजरा करतात. या पारंपरिक उत्सवात भाविक विविध देव-देवतांचे आणि नाथांचे पारंपरिक मुखवटे परिधान करतात. ॐ नमः आदेश आणि गोविंदा गोपाळाच्या जयघोषाने संपूर्ण लाईन आळी परिसर दुमदुमून निघतो. कोणत्याही पैशांच्या किंवा मानाच्या बक्षिसांशिवाय, अत्यंत पवित्र वातावरणात एका चांदीच्या काठीने म्हणजेच राजदंडाने ही पारंपरिक दहीहंडी फोडली जाते. आमची दहीहंडी हा केवळ एक सण नसून तो पनवेलच्या सांस्कृतिक अस्मितेचा आणि अखंड परंपरेचा ठेवा आहे. आजच्या काळात जिथे दहीहंडीला व्यावसायिक स्वरूप आले आहे, तिथे लाईन आळीतील ही हंडी आजही पूर्वजांनी सुरू ठेवलेली शुद्ध भक्ती आणि साधेपणा टिकवून आहे, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

### नवघर शाळेत गोपाळकाला उत्साहात | पाणी बचतीचा संदेश देत विद्यार्थ्यांचा सहभाग

# पर्यावरणपूरक 'निपुण हंडी'ने वेधले रायगडकरांचे लक्ष

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

गोपाळकाला निमित्ताने सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे 'निपुण महाराष्ट्र' कार्यक्रमांतर्गत पर्यावरणपूरक निपुण हंडी उपक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. पारंपरिक दहीहंडीला शैक्षणिक व पर्यावरणपूरक स्वरूप देत नवघर शाळेने यावर्षी अभिनव उपक्रम राबविला.

या निपुण हंडीमध्ये पाणी किंवा दही न वापरता लाह्या, चॉकलेट, पेन, पेन्सिल, खोडरबर यांसोबत निपुणपेटीअंतर्गत शैक्षणिक साहित्य ठेवण्यात आले. अक्षरे, अंक, प्राणी-पक्षी ओळख, शब्दकोडी, बेरीज-वजाबाकी तसेच विविध कृती व प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता.



त्यामुळे विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून वाचन, लेखन, संख्याज्ञान व विचारकौशल्याचा सराव करण्याची संधी मिळाली.

इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांनी प्राधान्याने या उपक्रमात सहभाग घेतला. त्यांच्यासोबत शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही हंडी तयार करणे, सजावट करणे व उपक्रमाच्या नियोजनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून निपुण हंडीला आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप दिले.

या उपक्रमात वर्गशिक्षिका रुपाली लेंडवे यांनी सहभाग घेतला. विषयशिक्षिका वृषाली गुरव व मुख्याध्यापक संगीता बैकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

> निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत पर्यावरणपूरक निपुण हंडीच्या माध्यमातून पाणीबचतीचा संदेश देतानाच विद्यार्थ्यांना खेळातून शिकण्याची संधी मिळते. अशा उपक्रमातून आनंददायी शिक्षणाला चालना मिळून निपुण विद्यार्थी घडण्यास निश्चितच मदत होईल.
> - राजेंद्र अंबिके, उपशिक्षक

दरम्यान, इयत्ता तिसरीतील विद्यार्थी अनिश दळवी याने, नवघरमधील यावेळची हंडी वेगळीच आहे; खूप मज्जा आली, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

पाणीबचत, पर्यावरण संवर्धन आणि निपुण शैक्षणिक कौशल्ये यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

# भाकरवड येथे महिला वर्गाचा दहीहंडी थरार



**| भाकरवड | वार्ताहर |**

अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे गोविंदाच्या निमित्ताने प्रथमच महिलांचा दहीहंडी फोडण्याचा थरार येथील ग्रामस्थांना अनुभवायला मिळाला हा उपक्रम भाकरवड गावचे विघ्नेश रमेश पाटील यांच्या मित्रमंडळाच्या संकल्पनेतून साकारण्यात आली.

गेल्या आठ दिवस सायंकाळी सात वाजता पस्तीस हून अधिक महिला वर्ग सराव करीत आहे आम्ही पाच थर लाऊन सलामी देणारच असा निर्धार या गोविंदा पथक महिला वर्गाने केलेला आहे. विघ्नेश पाटील मित्रमंडळास या बाबत विचारले असता त्यांनी आपल्या गावातील होतकरू महिला आहेत त्यांना कुठेतरी प्लॅटफॉर्म मिळायला हवे आत्मीयता, जोश एकरूपता याच्यावर भर देऊन सर्वांनी एकत्र येऊन दहीहंडी फोडणाऱ्या महिला वर्गास रोख रक्कम पाच हजार, सन्मानचिन्ह ग्रामस्थ मंडळ भाकरवडचे अध्यक्ष शंकर पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी आठशेहून अधिक ग्रामस्थ महिला तरुण मित्र मंडळी उपस्थित होते. तसेच गावातील नवरात्री महोत्सव मोठ्या उत्साही वातावरणात पार पडतो ग्रामस्थ, महिलावर्ग तरुण वर्ग एकत्र येऊन कोणाकडून देणगी न घेता अध्यक्ष शंकर पाटील यांच्या माध्यमातून दानशूर व्यक्तिमत्व यांच्या सहकार्यातून नऊ रात्री नऊ दिवस महाप्रसाद सर्व गावा साठी बनवला जातो ही परंपरा गेल्या तीस पस्तीस वर्षे गुण्या गोविंदाने अविरतपणे चालू आह.

गावात हरिपाठ, भजन नित्यनेमाने चालू आहे भक्तिमय वातावरण आणि याला सुद्धा उत्तमरित्या प्रतिसाद मिळत आहे. गावातील कोणतेही सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होतात त्याचाच एक भाग म्हणून विघ्नेश पाटील मित्रमंडळाच्या या सुप्त उपक्रमाने संपूर्ण गाव आनंदाने हर्षित झालेला दिसत आहे.

# जगण्याच्या जिद्दीला सलाम

सामान्य तर्काच्या पलिकडच्या गोष्टी घडल्या की आपण त्याला चमत्कार म्हणतो. नेपाळमध्ये असाच प्रकार घडला आहे. नऊ दिवस बोगद्यात अडकलेल्या किमान पाचशे लोकांपैकी दोघे जण जिवंत बाहेर आले आहेत. याचेही वर्णन चमत्कार असे करता येईल. पण तो खरे माणसाच्या जगण्याच्या जिद्दीचा आविष्कार आहे. त्याला सलाम करायला हवा. कितीही प्रतिकूल स्थिती असली तरी तिच्यावर मात करता येते हे दर्शवणारी ही घटना आहे. सभोवताली सतत नकारात्मक, निराश करणाऱ्या गोष्टी घडत असताना असा आविष्कार पाहायला मिळाला की माणसांना उभारी येते. नेपाळमध्ये २६ ऑगस्टला आलेल्या महापुरात आतापर्यंत तेराशेच्या वर लोक मरण पावले आहेत. पण सुमारे ५६०० लोक बेपत्ता आहेत. यातले किती लोक जिवंत हाती लागतील याबाबत शंका आहे. कारण आज पूर आल्याला दहा दिवस लोटले आहेत. या काळात जीवघेण्या थंडीत, पावसापाण्यात, अन्नाचा कण नसताना माणसे जिवंत राहतील अशी शक्यता कमी आहे. त्यामुळेच शुक्रवारसारखा चमत्कार हा मानवी मनाला दिलासा देतो. त्रिशुली नदीवरच्या एका जलविद्युत प्रकल्पाशी जोडलेल्या बोगद्यात हे शोधकार्य चालू होते. या भागातील सहा जलविद्युत प्रकल्पांच्या बोगद्यांमध्ये मिळून सुमारे ९०० लोक अडकलेले असावेत असा अंदाज आहे. त्यांचे बचावकार्य सध्या युध्द पातळीवर चालू आहे. यापैकीच एका थ्री-ए नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील ११५ कर्मचारी ज्या बोगद्यात अडकले आहेत त्यातील दोघे जण काल सुखरुप बाहेर आले. संजय साह आणि कबीर महारहन अशी त्यांची नावे आहेत. संजय साह हा मेकॅनिकल फोरमन म्हणून काम पाहत होता व त्या बोगद्यातील कंट्रोल रुमचा ताबा त्याच्याकडे होता. २६ ऑगस्टला पाण्याचा धोधाटा आला तेव्हा त्याने बाकीच्यांना पळून जीव वाचवायला सांगितले. पण त्याने स्वतः कामाची जागा सोडली नाही. ती माझी जबाबदारी होती असे तो म्हणतो. त्याच्यासोबत असलेला कबीर हा मेकॅनिकल सुपरवायझर होता. तोही मागे राहिला.

### टूथपेस्टसारखी अवस्था

तिबेटच्या सीमेवर कळसूबाई शिखराइतक्या उंचीवरून एक प्रचंड हिमनग नदीत कोसळला व त्याने पुढचा उत्पात माजवला. त्याच्या तडाख्याने नद्यांचे पाणी एकाएकी तीसचाळीस फुटांनी वाढले. या पुराच्या पाण्याचा दणका इतका होता की त्याच्या तडाख्याने प्रचंड झाडे, दगड, इमारती हे एखाद्या कागदाच्या कपट्याप्रमाणे वाहून गेले. त्यांच्या दणक्याने खाली आणखी हानी झाली. असंख्य डोंगर आडवे कापले गेले. त्यांच्या मातीमुळे गाळ तयार झाला. हा गाळ, तसेच दगड इत्यादी बोगद्यांमध्ये भरले गेले. टूथपेस्टच्या ट्यूबमध्ये पेस्ट भरावी तसा गाळ व माती या बोगद्यांमध्ये घट्ट जाऊन बसली आहे व हे बोगदे पॅक झाले आहेत असे वर्णन एका ऑस्ट्रेलियन इंजिनिअरने केले आहे. ऐतिहासिक काळात माणसांना भिंतीत चिणून मारत असत. अनारकलीला असेच मारले गेले असे चित्रण ये जिंदगी उसी की है या प्रसिध्द गाण्यात केलेले आहे. त्याच रीतीने या गाळाने बोगदे या गाळाने व इतर सामग्रीने चिणले गेले. यांच्या सांधेपोकळीमध्ये समजा कोठे माणसे जिवंत असलीच तरी त्यांच्यापर्यंत पोचणे हेही अशक्यप्राय बनावे अशी ही अवस्था आहे. या परिस्थितीत संजय आणि कबीर हे श्वास धरून राहिले व बचाव कामगार त्यांच्यापर्यंत पोचू शकले हे अद्भुत म्हणावे लागेल. यामध्ये संजयची शारीरिक स्थिती बरी आहे. तो पत्रकारांशी बोलू शकला. कबीरला मात्र हातपाय उचलण्याची शक्ती उरलेली नाही. तो जवळपास बेशुद्धावस्थेतच होता. आता त्याच्यावर उपचार चालू असून तो बरा होईल अशी आशा आहे. या नऊ दिवसांच्या काळात ते कसे जगले याची पूर्ण हकिगत अजून बाहेर आलेली नाही. आपण देवाच्या नावाचा जप करीत दिवस काढले असे संजयने म्हटले आहे. तो त्याआधारे जगला असे मानून धार्मिक मंडळी सुखाने राहू शकतात. या श्रध्देने संजयला बळ दिले असेल यात शंका नाही. पण त्याच्या विजिगीषू वृत्तीने, जगण्याच्या तीव्र इच्छेने त्याला तारले हेही तितकेच खरे आहे. खाली अडकलेले आणि अजूनही जिवंत असलेल्या आणखी तीनचार लोकांशी आपला संपर्क होता असेही संजय म्हणतो. कदाचित त्यांच्यातल्या आणखी काही जणांची सुटका होऊ शकेल.

### तंत्रज्ञान हवेच, पण....

निसर्ग हा प्रचंड ताकदवान आहे. त्याच्यापुढे कोणाचे चालू शकत नाही हे इरशाळगड, माळीणसारख्या आपल्याकडच्या दुर्घटनांपासून ते नेपाळमधल्या या महापुरापर्यंत वारंवार दिसले आहे. मात्र या संकटांमध्येही श्वास धरून टिकून राहता येते आणि जगता येते हे माणसांनी दाखवून दिले आहे. यापूर्वी २०२३ मध्ये उत्तराखंडच्या सिल्कियारा बोगद्यात ४१ कामगार १७ दिवस अडकून पडले होते. त्यावेळी त्यावेळी विविध प्रकारे बोगदा फोडून त्यांची सुटका करण्यात आली होती. २०१८मध्ये थायलंडमध्ये थाम लुआंग लेण्यांच्या परिसरात अचानक पाणी भरल्याने एक फुटबॉल संघ प्रदीर्घ काळ अडकून पडला होता. त्यांच्या सुटकेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरून बचाव कार्य करण्यात आले. अनेक देशांची पथके तेथे आली. अखेर त्यातल्या १३ जणांना वाचवण्यात यश आले होते. चिली, ऑस्ट्रेलिया, अमेरिका येथील खाणी किंवा पर्वतीय प्रदेशातही पूर्वी असे प्रकार घडले आहेत. यावर मात करण्याची तंत्रे मानवाने शोधली आहेत. पण प्रत्येक ठिकाणच्या अडचणी भिन्न प्रकारच्या असतात. आज नेपाळमध्ये काही भागात एक-दोन मजले उंच इतका गाळ भरला आहे. त्यामुळे तेथे वाहने घेऊन जाणे तर सोडाच, पण माणसांनी प्रवेश करणेही अशक्य बनले आहे. त्रिशुली नदीवर सध्या केबल कारचा उपयोग करून सामान ने-आण केली जात आहे. नेपाळमध्ये ही जगभरातून मदत येते आहे व येईल. त्यातून तेथील प्रकल्प, इमारती, घरे, गावे कदाचित पुन्हा उभी राहतील. पण हे सगळे ज्या माणसांसाठी करायचे त्यांच्यातले निदान काही जण श्वास धरून व टिकवून असलेले आढळले व त्यांना वाचवता आले तर अर्थातच अधिक आनंद होतो. पूर्वी वाळवंटे, बर्फाळ प्रदेश किंवा समुद्र यामध्ये संकटात सापडलेल्या व त्यांच्यावर जिद्दीने मात करणाऱ्या माणसांच्या साहसकथा वारंवार सांगितल्या जायच्या व आवडीने ऐकल्याही जायच्या. आता इंटरनेटचा प्रसार झाला. कोणालाही कोठूनही संपर्क साधणे शक्य झाले. आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे तंत्रज्ञानाने नवी भरारी घेतली. आकाश असो की पाताळ, काहीच अजिंक्य नाही असा समज तयार झाला. कोणतीही संकटे आली तरी हे तंत्रज्ञान आपल्याला सोडवेल असा एक समज तयार झाला. पण तो किती अपुरा आहे हे नेपाळसारख्या दुर्घटनांमधून समोर येत असते. अशा संकटांमधून बाहेर येण्यासाठी माणसाला हवी असते जिद्द व श्वास न सोडण्याची तीव्र इच्छा. तंत्रज्ञानामुळे ती आपण गमावत चाललो आहोत की काय अशी शंका येते. पण संजय आणि कबीरच्या सुटकेमुळे सर्वच काही संपलेले नाही याची प्रचिती येते.

## विचार

# तालिबानची पाच वर्षे: महिलांचे संपलेले स्वातंत्र्य

***तालिबानला सत्ता मिळवता आली; पण महिलांचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन आधुनिक राष्ट्र उभे करता येत नाही. बंदुकीच्या बळावर सत्ता टिकवता येते, समाजाचे भविष्य घडवता येत नाही. काबूलच्या रस्त्यांवर महिला निर्भयपणे चालतील, मुलींच्या हातात पुस्तके असतील, तेव्हाच अफगाणिस्तानचे खरे पुनर्निर्माण सुरू होईल. तोपर्यंत तालिबानचे पाच वर्षांचे 'स्थैर्य' प्रत्यक्षात लाखो अफगाण महिलांची कैदच मानावे लागेल.***



**आरिफ शेख**

१५ ऑगस्ट २०२१. अफगाणिस्तानच्या इतिहासातील हा दिवस केवळ सत्तांतराचा दिवस नव्हता, तर तो लाखो अफगाण नागरिकांच्या, विशेषतः महिलांच्या आणि मुलींच्या स्वातंत्र्यावर पुन्हा पडलेल्या अंधाराचा दिवस होता. अमेरिकन सैन्याच्या माघारीनंतर तालिबानने काबूलवर ताबा मिळवला आणि दोन दशकांनंतर पुन्हा अफगाणिस्तानची सत्ता आपल्या हातात घेतली. आता या सत्तेला पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. या पाच वर्षांत तालिबानने देशावर आपली पकड मजबूत केली, सुरक्षा यंत्रणा उभी केली, प्रशासन चालवले आणि अनेक देशांशी राजनैतिक व आर्थिक संबंध वाढवले; मात्र या तथाकथित स्थैर्याच्या बदल्यात अफगाण महिलांना आपल्या स्वातंत्र्याची किंमत मोजावी लागली आहे. तालिबानच्या पाच वर्षांच्या राजवटीचे मूल्यमापन करताना एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल, ती म्हणजे केवळ एका सरकारची धोरणात्मक चूक नाही, तर एका संपूर्ण समाजातील अर्ध्या लोकसंख्येला सार्वजनिक जीवनातून जवळजवळ हद्दपार करण्याचा सुनियोजित प्रयत्न आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते, तालिबानने सत्तेवर आल्यानंतर महिलांच्या अधिकारांवर शंभरहून अधिक निर्बंधात्मक आदेश लागू केले आहेत. शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, प्रवास, सार्वजनिक ठिकाणी वावरणे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अशा जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात महिलांचे अधिकार संकुचित करण्यात आले आहेत. सर्वांत भयावह बाब म्हणजे मुलींच्या शिक्षणावर घातलेली बंदी. आज अफगाणिस्तान हा जगातील एकमेव देश आहे, जिथे मुलींना माध्यमिक आणि उच्च शिक्षणापासून औपचारिकरीत्या दूर ठेवण्यात आले आहे.

'युनेस्को'च्या ताज्या आकडेवारीनुसार, सुमारे २४ लाख अफगाण मुली माध्यमिक शिक्षणापासून वंचित आहेत. २०२१ मध्ये तालिबानने सत्ता हाती घेतली, तेव्हा जवळपास दहा लाख मुली माध्यमिक शाळांमध्ये शिकत होत्या. पाच वर्षांत एका पिढीचे शैक्षणिक भविष्य उद्ध्वस्त करण्याइतका हा मोठा उलटफेर आहे. याचा परिणाम आज दिसत नसला, तरी पुढील दशकात त्याची किंमत अफगाणिस्तानला मोजावी लागणार आहे. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासक, पत्रकार, वकील आणि अन्य व्यावसायिक निर्माण करण्याची प्रक्रिया थांबवून कोणताही देश आधुनिक होऊ शकत नाही. मुलींना शिक्षणापासून दूर ठेवणे म्हणजे केवळ त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा आणणे नव्हे, तर देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक क्षमतेवरच कुऱ्हाड चालवणे होय. याची जाणीव आर्थिक आकडेवारीतूनही होते. 'युनिसेफ'च्या २०२६ च्या विश्लेषणानुसार, मुलींच्या शिक्षणावर आणि महिलांच्या रोजगारावर निर्बंध कायम राहिल्यास २०३० पर्यंत अफगाणिस्तानमध्ये सुमारे २० हजार महिला शिक्षक आणि ५,४०० महिला आरोग्य कर्मचारी गमावले जाऊ शकतात. महिलांच्या शिक्षण आणि रोजगारावरील निर्बंधांमुळे देशाला दरवर्षी सुमारे ८४ कोटी डॉलरच्या आर्थिक उत्पादनाचे नुकसान होत असल्याचेही या विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे.

तालिबान ज्या 'इस्लामी व्यवस्थे'च्या नावाखाली हे निर्बंध लादत आहे, त्याच धोरणामुळे अफगाणिस्तान आर्थिकदृष्ट्याही कमकुवत होत आहे. स्त्रीला घरात डांबून ठेवणारा समाज आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ शकत नाही. महिलांच्या श्रमशक्तीला बाहेर ठेवून रोजगारनिर्मिती, आरोग्यसेवा, शिक्षण आणि उत्पादनक्षमता वाढवण्याचे स्वप्न पाहणे ही आत्मवंचना आहे. तालिबानची 'सदाचार आणि दुर्गुण प्रतिबंध' कायद्याची अंमलबजावणी ही या दडपशाहीचे आणखी एक उदाहरण आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, या कायद्याची अंमलबजावणी ३४ पैकी २८ प्रांतांत करण्यात आली असून सुमारे ३,३०० निरीक्षकांना व्यापक अधिकार देण्यात आले आहेत. महिलांच्या पोशाखापासून सार्वजनिक ठिकाणी वावरण्यापर्यंत अनेक बाबींवर नियंत्रण ठेवले जात आहे. महिलांच्या आरोग्यसेवेपर्यंत पोहोचण्यावरही त्याचा परिणाम झाला आहे. महिलांनी सार्वजनिक ठिकाणी कसे वावरावे, काय घालावे, कुठे जावे आणि कोणासोबत प्रवास करावा, यावर राज्याचे नियंत्रण असणे ही आधुनिक राष्ट्राची ओळख असू शकत नाही. जून २०२६ मध्ये हेरातमध्ये पोशाखाच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून किमान २१ महिला व मुलींना ताब्यात घेतल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी चिंता व्यक्त केली होती. महिलांना रोजगारापासून दूर करण्याचे धोरणही तितकेच गंभीर आहे.

सरकारी सेवा, स्वयंसेवी संस्था, माध्यमे आणि अन्य क्षेत्रांमध्ये महिलांची उपस्थिती सातत्याने कमी होत आहे. महिलांना काम करण्यापासून रोखल्याने त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर घाला येतो आणि कुटुंबाच्या उत्पन्नावरही परिणाम होतो. यापेक्षाही गंभीर परिणाम म्हणजे महिलांच्या अनुपस्थितीमुळे महिलांना मिळणाऱ्या आरोग्यसेवा आणि शिक्षणावर परिणाम होतो. महिला डॉक्टर नसतील तर महिलांनी वैद्यकीय उपचार कसे घ्यायचे, हा प्रश्नच निर्माण होतो. तालिबानच्या राजवटीचा आणखी एक धोकादायक पैलू म्हणजे महिलांचे सार्वजनिक अस्तित्वच कमी करण्याची प्रक्रिया. शिक्षण नाही, रोजगार नाही, सार्वजनिक जीवनात सहभाग नाही, मुक्त प्रवासावर बंधने आणि पोशाखावर कठोर नियंत्रण या सर्व निर्बंधांची बेरीज केली तर महिला नागरिक राहात नाही, तर ती केवळ घराच्या चार भिंतींमध्ये मर्यादित व्यक्ती बनते. हा प्रकार केवळ महिला हक्कांचा प्रश्न नाही, तर नागरिकत्वाच्या मूलभूत संकल्पनेलाच आव्हान आहे. तालिबान मात्र या सर्व निर्णयांचे समर्थन धार्मिक मूल्यांच्या नावाखाली करते; पण धर्माच्या नावाखाली नागरिकांचे मूलभूत अधिकार काढून घेणे आणि धार्मिक श्रद्धेचे स्वातंत्र्य यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. कोणत्याही धर्माची व्याख्या राज्यसत्तेने आपल्या राजकीय सोयीसाठी करून त्याचा आधार घेतला, तर धर्माचेही नुकसान होते आणि समाजाचेही. गेल्या पाच वर्षांत तालिबानला आंतरराष्ट्रीय पातळीवर काही प्रमाणात राजनैतिक स्वीकार मिळाला आहे, ही बाबही चिंताजनक आहे; मात्र येथे एक तथ्य दुरुस्त करणे आवश्यक आहे. तालिबान सरकारला अनेक देशांनी औपचारिक मान्यता दिलेली नाही. जुलै २०२५ मध्ये रशिया हा तालिबान सरकारला औपचारिक मान्यता देणारा पहिला देश ठरला. त्याचवेळी चीनसह अनेक देशांनी तालिबानशी राजनैतिक, आर्थिक आणि सुरक्षाविषयक संपर्क वाढवला आहे. म्हणजेच औपचारिक मान्यता मर्यादित असली, तरी व्यवहारातील संबंध वाढत आहेत. यातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा दुटप्पीपणाही समोर येतो. एका बाजूला जग तालिबानच्या महिला-विरोधी धोरणांवर टीका करते, तर दुसऱ्या बाजूला दहशतवाद, स्थलांतर, व्यापार, खनिजसंपत्ती आणि प्रादेशिक सुरक्षेच्या प्रश्नांमुळे त्याच तालिबानशी व्यवहारही करते. राजकारणात व्यवहार्यतेला महत्त्व असते, हे खरे; पण व्यवहार्यतेच्या नावाखाली मानवी हक्कांचे मोल कमी केले जाऊ नये. तालिबानच्या पाच वर्षांच्या राजवटीत हिंसाचारात घट झाल्याचे चित्र काही प्रमाणात दिसते; पण युद्ध नसणे म्हणजे स्वातंत्र्य असणे नव्हे. बंदुकीच्या गोळ्या थांबल्या, म्हणून एखादा समाज मुक्त झाला, असे म्हणता येत नाही. एखाद्या मुलीला शाळेत जाता येत नसेल, महिलेला काम करता येत नसेल आणि स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकार नसेल, तर त्या समाजाला 'स्थिर' म्हणण्याआधी 'कशासाठी स्थिर?' हा प्रश्न विचारावा लागतो.

युद्ध संपले, तालिबान सत्तेवर स्थिर झाले आणि त्यामुळे अफगाणिस्तानची समस्या जणू संपली, अशी धोकादायक मानसिकता निर्माण होत आहे. प्रत्यक्षात संकट अधिक खोलवर गेले आहे. संयुक्त राष्ट्रांनी २०२६ मध्ये महिलांच्या कार्यक्रमांसाठी निधी कमी होण्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. महिलांसाठी काम करणाऱ्या संस्थांपैकी निम्म्याहून अधिक संस्था निधीअभावी बंद होण्याच्या धोक्यात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. अफगाण जनतेला मानवी मदत देणे आवश्यक आहे; पण मदत देताना तालिबानच्या महिला-विरोधी धोरणांना अप्रत्यक्ष वैधता मिळणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागेल. शिक्षण, आरोग्य आणि महिलांच्या आर्थिक सहभागासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. अफगाणिस्तानच्या आजच्या वास्तवाकडे पाहताना जगाने तालिबानच्या 'पाच वर्षांच्या सत्तेचा उत्सव' नव्हे, तर अफगाण महिलांच्या पाच वर्षांच्या हरवलेल्या अधिकारांची मोजदाद करायला हवी. कारण एका पिढीच्या मुलींच्या शिक्षणावर पडलेला अंधार केवळ त्या मुलींच्या आयुष्यावर परिणाम करत नाही, तर तो संपूर्ण राष्ट्राच्या भवितव्यावर सावली टाकतो.

## चर्चा आजची

# गणेशोत्सव उत्साहाचा, उन्माद कशाला?

गणपती बाप्पाला श्रद्धेने घरी आणायचे आरती, भजन, फुलांची सजावट आणि भक्तीमय वातावरणात गणेशोत्सव साजरा करायचा; पण विसर्जनाच्या मिरवणुकीत मात्र कानठळ्या बसवणारा डीजे, डॉल्बीचा दणदणाट, लेझरचा झगमगाट आणि बेभान नाच, हा खरोखर आपल्या सणाचा भाग आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. आणि, सामाजिकदृष्ट्या योग्य आहे.

कारण, उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषणाचा अतिरेक करण्याची गरज काय? गणपती बाप्पाला आपली भक्ती ऐकवायची आहे की डीजेचा आवाज? श्रद्धा मनात असते, ती भिंती हादरवणाऱ्या आवाजात सिद्ध करण्याची गरज नसते.आज अनेक ठिकाणी मिरवणूक सुरू झाली की आवाजाची स्पर्धाच सुरू होते. कोणाचा डीजे मोठा, कोणाचा आवाज अधिक कर्कश, कोणाची मिरवणूक अधिक वेळ चालणार; यात भक्ती मागे पडते आणि 'दिखावा' पुढे येतो. परिणामी, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, विद्यार्थी आणि परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांना मोठा त्रास सहन करावा लागतो. याचे समाजाला भान आहे की नाही? आवाजाच्या स्पर्धेत आपण स्वतःची पयार्याने समाजाची मोठी हानी करीत आहोत, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**राकेश लोहार**

अतितीव्र आवाजाचा परिणाम कानांवर होतो. सतत मोठ्या आवाजाच्या संपर्कामुळे कानात आवाज येणे, ऐकण्याची क्षमता कमी होणे, डोकेदुखी, चिडचिड, झोपेचा त्रास आणि मानसिक ताण निर्माण होऊ शकतो. हृदयविकार किंवा इतर गंभीर आजार असलेल्या व्यक्तींना अचानक होणारा प्रचंड आवाज अधिक त्रासदायक ठरू शकतो. मग दुसऱ्याच्या आरोग्याची किंमत मोजून आपला उत्सव साजरा करण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला?

मिरवणुकीत प्रखर लेझर दिवे, झगमगणाऱ्या प्रकाशयोजना आणि डोळ्यांवर सतत पडणारा तीव्र प्रकाश यामुळेही त्रास होऊ शकतो. गणपतीच्या



मिरवणुकीचे सौंदर्य पारंपरिक ढोल-ताशा, भजन, टाळ-मृदंग, फुगडी, लेझीम आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत आहे. मग अतिरेक करून उत्सवाचे स्वरूपच का बदलायचे? लोकमान्य टिळकांनी उत्सव सुरू केला तो समाज जोडण्यासाठी! सार्वजनिक गणेशोत्सवाचा मूळ उद्देश समाजाला एकत्र आणणे, जनजागृती करणे आणि सामाजिक ऐक्य निर्माण करणे हा होता. आज मात्र काही ठिकाणी उत्सव म्हणजे मोठमोठे ध्वनिक्षेपक, खर्चिक सजावट आणि शक्तिप्रदर्शन अशी व्याख्या होताना दिसते.

आपण बाप्पाचा उत्सव साजरा करतोय की आवाजाची स्पर्धा? भक्तीचा आवाज मोठा असावा; डीजेचा नाही.उत्सव साजरा करा; पण दुसऱ्याचा उत्सव हिरावून घेऊ नका!

गणेशोत्सव हा प्रत्येकाचा आहे. एखाद्याला मिरवणुकीत नाचण्याचा आनंद मिळतो, तर दुसऱ्याला शांतपणे बाप्पाचे दर्शन घेण्यात समाधान मिळते. कोणाच्याही आनंदामुळे दुसऱ्याच्या शांततेचा, आरोग्याचा आणि जगण्याचा हक्क बाधित होऊ नये. डीजे नसेल तर उत्सव अपुरा ठरत नाही. डॉल्बी नसेल तर भक्ती कमी होत नाही. उलट, कमी आवाजात पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशांचा शिस्तबद्ध गजर, भजन-कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतूनही गणेशोत्सव अधिक सुंदर, संस्कृतीपूर्ण आणि सर्वसमावेशक होऊ शकतो.

गणपती बाप्पाच्या मिरवणुकीत भक्तीचा जयघोष असावा, ढोल-ताशांचा ताल असावा, लेझीमचा नाद असावा, भजन-कीर्तन असावे, टाळ-मृदंगाचा गजर असावा. पण आवाजाची मर्यादा ओलांडून संपूर्ण परिसर हादरवण्याची गरज काय? गणेशोत्सव अनेक दिवसांचा असतो. या काळात शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी अभ्यास करत असतात. स्पर्धा परीक्षा, विविध प्रवेश परीक्षा आणि शैक्षणिक परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शांत वातावरण महत्त्वाचे असते. एका बाजूला पालक मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात; अभ्यासासाठी शांत वातावरण निर्माण करतात. आणि दुसऱ्या बाजूला रात्री उशिरापर्यंत कर्णकर्कश आवाज सुरू असेल, तर त्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे काय?

डीजे, ध्वनियंत्रणा, प्रकाशयोजना आणि इतर दिखाव्यावर मोठा खर्च करण्यापेक्षा तोच पैसा एखाद्या गरजू विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी, गरीब रुग्णाच्या उपचारासाठी, वृक्षारोपणासाठी, रक्तदान शिबिरासाठी किंवा गावातील एखाद्या सार्वजनिक कामासाठी वापरला तर? सार्वजनिक गणेशोत्सवामागे समाजाला एकत्र आणण्याचा, लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा आणि सामाजिक एकजूट मजबूत करण्याचा व्यापक विचार होता. आज त्या उत्सवाचे रूप केवळ मनोरंजन आणि शक्तिप्रदर्शनाकडे वळत असेल, तर थांबून विचार करण्याची वेळ आली आहे.

आपल्या महाराष्ट्राची स्वतःची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. ढोल-ताशे, लेझीम, भजन, कीर्तन, गोंधळ, भारूड, पोवाडा, टाळ-मृदंगया परंपरांमध्ये उत्साहही आहे आणि संस्कृतीही आहे. मग बाहेरून आलेल्या कर्णकर्कश मनोरंजनाच्या पद्धतींचे अंधानुकरण करण्याची गरज काय? कुणाच्याही श्रद्धेला विरोध नाही. गणपती बाप्पाचा उत्सव उत्साहात साजरा झाला पाहिजे. मिरवणुका निघाल्या पाहिजेत. ढोल-ताशे वाजले पाहिजेत. तरुणाईने आनंद घेतला पाहिजे. पण, या सगळ्याला शिस्त, मर्यादा आणि सामाजिक भान असले पाहिजे.

## लोकसंसद

### धक्काबुक्की नव्हे, पारदर्शक कारभार हवा!

बदलापूर नगरपालिकेतील एका पक्षाच्या कार्यकर्त्या असलेल्या ठेकेदार आणि नियोजन समितीच्या सभापती यांच्यात कामांच्या बिलावरून झालेला वाद धक्काबुक्कीपर्यंत पोहोचल्याची घटना अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि ठेकेदार यांच्यातील मतभेद चर्चा व नियमांच्या चौकटीत सोडवले जाणे अपेक्षित असताना त्याचे रूप थेट वाद आणि आरोप-प्रत्यारोपात होणे ही लोकशाही व्यवस्थेसाठी दुर्दैवी बाब आहे. नगरपालिकेच्या विकासकामांची बिले मंजूर करताना संबंधित कामाचा दर्जा, प्रत्यक्ष कामाची पूर्तता आणि शासनाचे नियम यांचा काटेकोरपणे विचार झाला पाहिजे. ठेकेदारांनी कामांच्या बिलांसाठी टक्केवारी मागितल्याचे आरोप होत असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच पदाधिकाऱ्यांवर किंवा अधिकाऱ्यांवर केलेले आरोपही केवळ राजकीय आरोप म्हणून दुर्लक्षित न करता त्यामागील सत्य तपासले पाहिजे. सार्वजनिक पैशांचा विनियोग हा जनतेच्या हितासाठी असतो. त्यामुळे विकासकामांच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार, टक्केवारीचा व्यवहार किंवा दबावाला स्थान असता कामा नये. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. नगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांनी परस्परांवर आरोप करण्याऐवजी पारदर्शक कारभार, नियमांचे पालन आणि जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. धक्काबुक्कीच्या राजकारणापेक्षा पारदर्शक प्रशासन आणि जबाबदार लोकप्रतिनिधित्व हीच लोकशाहीची खरी गरज आहे.

**– श्याम ठाणेदार,** ठाणे

## दिनविशेष

# आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक

१८५७ साली झालेला उठाव हा भारतीय इतिहासातील इंग्रजांविरोधात झालेला पहिला उठाव आहे असे मानले जाते मात्र त्या अगोदरही इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी अनेक छोटेमोठे उठाव झाले मात्र त्यातील काही उठावांची नोंद इतिहासात घेण्यात आली तर काही काही उठावांची नोंदच झाली नाही. अशाच एका उठावाचे जनक ज्यांनी इंग्रजांना सलग १४ वर्ष पळता भुई थोडी केली त्या आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची आज जयंती. मात्र आज त्यांची जयंती असूनही त्यांची जयंती साजरी करावी असे कोणालाही वाटत नाही कारण ते ज्या समाजात जन्मले तो रामोशी बेडर समाज आजही उपेक्षितच आहे त्यामुळे इतका मोठा क्रांतिकारक भारताच्या इतिहासात होऊन गेला हे आजही अनेकांना माहीत नाही. आद्य क्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म ७ सप्टेंबर १७९१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव दादोजी खोमणे होते. त्यांचे कुटुंबीय पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत असे म्हणून त्यांना नाईक ही पदवी मिळाली पुढे ते नाईक याच नावानेच ओळखले जाऊ लागले. लहानपणापासून काटक, चंचल आणि शूर असणारे निधड्या छातीचे उमाजी नाईक यांना गुलामगिरीची चीड होते. इंग्रजांनी पुण्यात दुसऱ्या बाजीरावास स्थानापन्न केले तेंव्हा त्यांनी पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी रामोशी बेडर समाजाकडून काढून घेतली आणि स्वतःच्या मर्जीतील लोकांना ती जबाबदारी दिली त्यामुळे साहजिकच रामोशी समाज खवळला त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली जबाबदारी अशी अचानक काढून घेतल्याने उमाजी नाईक कमालीचे संतप्त झाले शिवरायांपासूनच स्फूर्ती घेऊन त्यांनी आपल्या काही साथीदारांसह इंग्रजांना भारतातून हाकलून देण्याची शपथ घेतली. उमाजी नाईक समाजातील गोरगरिबांना आर्थिक मदत करत त्यासाठी ते इंग्रज, सावकार आणि मोठ्या वतनदारांना लुटत. जर कोणी माता भगिनींवर अन्याय करत असत तर ते भावाप्रमाणे धावून जात असत. या दरम्यान त्यांना एकदा अटक झाली त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली. या एका वर्षात ते तुरुंगातच लिहायला शिकले. एका वर्षाची शिक्षा भोगून आल्यावर त्यांच्या कारवाया आणखी वाढल्या. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांनी इंग्रजांविरुद्ध लपून छपून लढाया केल्या. २१ डिसेंबर १८३० ला उमाजींनी आपला पाठलाग करणाऱ्या इंग्रज अधिकारी बॉईड आणि त्याच्या सैन्याला मांढरदेवी गडावरून बंदुका, गोफणी चालवून पळवून लावले. त्यांच्या या बंडाला जनतेतूनही मोठा प्रतिसाद मिळत होता. १५ डिसेंबर १८३१ रोजी भोर तालुक्यातील उत्रोली गावात उमाजींना पकडण्यात आले. उमाजींवर देशद्रोहाचा खटला चालवण्यात आला. ३ फेब्रुवारी १८३२ ला उमाजींना फाशी देण्यात आली. देशासाठी फासावर जाणारा उमाजी हा पहिला क्रांतिकारक ठरला. फासावर चढण्यापूर्वी उमाजींचे शेवटचे शब्द होते शिवाजी महाराज की जय! वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी देशासाठी हसत हसत फासावर चढणारा हा क्रांतिकारक भारताच्या इतिहासातील पहिला क्रांतिकारक ठरला म्हणून त्यांना आद्यक्रांतिकारक असे म्हणतात. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन पुढे अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले मात्र दुर्दैवाने या महान क्रांतिकारकाने केलेली क्रांती आजही खूप कमी लोकांना माहीत आहे म्हणूनच आज त्यांच्या जयंतीदिनी सर्वांनी त्यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीला करुन द्यावी. आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**७ सप्टेंबर**

१) श्री. विश्वनाथ कृष्ण डोंगरे अलिबाग, ७-९-१९५०

२) श्रीम. लिलावती एकनाथ म्हात्रे अलिबाग, ७-९-१९५४

३) श्री. शिरीष पद्माकर लेले अलिबाग, ७-९-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# पालकमंत्री दहीहंडी उत्सवात गोविंदा जखमी

## ■ सातव्या थरावरून कोसळल्याचा व्हिडिओ व्हायरल; जखमींवर महाडमध्ये उपचार सुरू

**। महाड । प्रतिनिधी ।**

संपूर्ण महाराष्ट्रात शनिवारी (दि.५) दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. शहरांसह ग्रामीण भागात विविध मंडळांकडून आकर्षक दहीहंड्या उभारण्यात आल्या असून, मोठमोठ्या बक्षिसांच्या स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या होत्या. दरम्यान, महाड शहरात आयोजित करण्यात आलेल्या पालकमंत्री दहीहंडी उत्सवादरम्यान चार गोविंदा जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.



मंत्री भरत गोगावले मित्र मंडळाच्यावतीने महाड शहरात भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी माणगाव, खेड, पोलादपूर, बिरवाडी, दापोली तसेच परिसरातील विविध भागांतून मोठ्या संख्येने गोविंदा पथके महाडमध्ये दाखल झाली होती. दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांकडून मानवी मनोरे रचण्यात येत होते. यावेळी उंच थर रचत असताना काही गोविंदा खाली कोसळल्याने चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. सातव्या थरावरून गोविंदा कोसळल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, या घटनेची शहरात मोठी चर्चा सुरू आहे.

या दुर्घटनेत सुरज संभाजी भोसतेकर (माणगाव मित्र मंडळ), रुपेश सिताराम शिंदे (माणगाव मित्र मंडळ), अजय रमेश पिंगळे (सुशेरी एकविरा गोविंदा पथक, खेड) आणि सुमित वसंत सकपाळ (खेड मित्र मंडळ) हे गोविंदा जखमी झाले आहेत. या जखमी गोविंदांना तातडीने प्राथमिक उपचारासाठी महाड येथील स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. यापैकी माणगाव येथील एका गोविंदाला गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, त्याच्या प्रकृतीबाबत अधिकृत आणि सविस्तर माहिती अद्याप उपलब्ध होऊ शकलेली नाही. दरम्यान, दहीहंडी उत्सवातील या दुर्घटनेमुळे काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या संख्येने गोविंदा पथके आणि नागरिक उपस्थित असलेल्या या उत्सवात सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबतही चर्चा सुरू झाली आहे.

## श्री कृष्ण जन्माची ७२ वर्षांची परंपरा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावातील टेप आळी येथील किसन खडे आणि नारायण खडे यांच्या घरी श्री कृष्ण जन्माचा सोहळा दरवर्षी साजरा होत असतो. त्यांनी गेल्या ७२ वर्षांची परंपरा जपली आहे. या कुटुंबातील तिसरी पिढी ही परंपरा जपण्यासाठी आघाडीवर असल्याचे दिसून आले. कैलास खडे आणि केदार खडे यांनी श्री कृष्ण जन्माचा सोहळा आपलासा केला आहे. खडे कुटुंबियांकडून शुक्रवारी (दि.४) रात्री ८.०० वाजल्यापासून श्री कृष्णाचा जन्म होईपर्यंत विविध प्रकारचे कार्यक्रम साजरे केले गेले. मध्यरात्री १२.०० वाजता भगवान श्री कृष्णाचा जन्म पाळणा गीत गाऊन पाळणा हलवून साजरा केला गेला. त्या आधी भजनाची बारी पार पडली. खडे कुटुंबातील बहुसंख्य सदस्यांना भजनाची आवड असल्याने सर्वजण भजनामध्ये सहभागी होत असतात. दरम्यान, हा श्री कृष्ण जन्माचा सोहळा पाहण्यासाठी परिसरातील भावीकांची मोठी गर्दी झाली होती.

## नांदगावमध्ये पारंपरिक दहीहंडी साजरी

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुडतालुक्यातीलनांदगावमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव व पारंपारिक दहीहंडीचा थरार अनुभवायला मिळाला. यावेळी गावातील तरुणाईचा उत्साह अक्षरशः शिगेला पोहोचला होता. गेली अनेक वर्षांची परंपरा असलेल्या नांदगाव पंच कमिटीचे अध्यक्ष उमाकांत चोरघे, सरपंच सेजल घुमकर, नरेश कुबल, कृष्णा मळेकर आदी मान्यवरांच्या नेतृत्त्वाखाली श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव साजरा केला गेला. येथील अमृतेश्वर मंदिरात नारळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासून साप्ताहिक जागराच्या कार्यक्रमाने उत्सवाला प्रारंभ करण्यात आला होता.



जन्माष्टमीला ग्रंथ पठण, स्थानिक भजनी मंडळांची सुस्वर भजने, श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा सोहळा, पाळणा गीत, दहिपोह्याच्या काल्याच्याप्रसादानंतरदहिहंडीफोडी व रात्री उशिरा नारळ फोडी इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गोपाळकाल्याच्या दिवशी दुपारी १२.०० वाजता जागर समाप्ती झाली. त्यानंतर गावातील अबालवृद्ध गोविंदांनी घरोघरी बांधण्यात आलेल्या सुमारे ३० ते ४० दहीहंड्या एकावर एक थर लावून, पाण्याचा मारा सहन करीत, हातात हात घेऊन बेधुंदपणे नाचत आणि ''गोविंदा रे गोपाळा'' म्हणत फोडण्यात आल्या. यादरम्यान, मिरवणुकीत गावच्या बाजारपेठेतील नाक्यावर वाघ बकरी, आट्यापाट्या, मामाचं पत्र हरवलं, उभा खो-खो आणि नवस मिरवणुक इत्यादी खेळ रंगले होते. त्यानंतर सायंकाळी उशिरा या मिरवणुकीची सांगता नांदगाव समुद्रकिनारी स्नान करून करण्यात आली. यावेळी पंच कमिटी अध्यक्ष उमाकांत चोरघे, सदस्य पांडुरंग निरकर, नरेश कुबल, कुसुमाकर घुमकर, प्रभाकर निरकर, उदय रणदिवे व अन्य मान्यवर उपस्थित होते.



## शिवकन्या गोविंदा पथकाचा उत्साह

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील एकमेव महिला गोविंदा पथक म्हणून ओळख असलेल्या शिवकन्या महिला गोविंदा पथकाने यंदाही छत्रपती शिवाजी महाराज चौकात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. त्यामुळे सुमारे ६०० महिला सदस्यांचा सहभाग असलेल्या या पथकाने शिस्तबद्ध पद्धतीने दहीहंडी उत्सवाची परंपरा कायम राखली. शिवकन्या म हिला गोविंदा पथकाची स्थापना महिलांना दैनंदिन जीवनातील जबाबदाऱ्यांमधून काही काळ मुक्त होऊन मनमुराद आनंद घेता यावा, त्यांच्यातील कलागुणांना आणि उत्साहाला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने करण्यात आली आहे. दरवर्षी या पथकाच्या माध्यमातून महिलांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळतो. यंदाच्या दहीहंडी उत्सवात विविध गाण्यांच्या ठेक्यावर महिलांनी ताल धरत जल्लोष केला. शिस्त, एकजूट आणि उत्साहाचे दर्शन घडवत महिला गोविंदांनी दहीहंडी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. या उत्सवामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपश्री पोटफोडे, डॉ. नीता कदम, दीपिका शिगवण आणि जागृती जैन यांच्यासह महिला सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली. त्यामुळे शिवकन्या महिला गोविंदा पथकाने पुन्हा एकदा दहीहंडीच्या माध्यमातून महिलांच्या सहभागाला नवी ओळख देत 'महिलाही उत्सवाच्या केंद्रस्थानी' हा संदेश अधोरेखित केला.


■ (छायाचित्र : संतोष रांजणकर)

# खोत परीवाराचा दहीहंडी सोहळा

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुडमधील भंडारवाड्यात स्व.नारायण खोत यांच्या निवासस्थानी १३५ वर्षांची परंपरा लाभलेला खोत परीवाराचा पारंपारिक श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. लोकमान्य टिळक रस्त्यावरील भंडारवाडा येथील लक्ष्मण बाबाजी खोत यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सवाची सुरुवात १८९१ पासून सुरू केली. त्यानंतर शांताराम खोत, नारायण खोत त्यांच्यानंतर सुरेश खोत हे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव परंपरा राखीत साजरा करीत आहेत. यानिमित्ताने श्री कृष्ण जन्माष्टमीपर्यंत सलग सात दिवस याठिकाणी ज्ञानेश्वर पारायण आणि भजन कीर्तनाने केली जाते. विशेष म्हणजे हा उत्सव साजरा करण्यासाठी मुस्लिम बांधवांचा देखील मोठा सहभाग असतो.

## कृष्णकथेतून आनंद वाटण्याचा संदेश

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

''आपल्याला मिळालेले इतरांनावाटावे''हामहत्त्वपूर्णसंस्कार श्रीकृष्णाच्या विचारसरणीतून मिळतो. ज्ञान, संस्कार, आनंद आणि प्रसाद एकमेकांना वाटण्यातच खरा शिष्टाचार आहे, असे मत रामदास पाटील यांनी व्यक्त केले. गोपाळकाळा निमित्त होराळे येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. दंहीहंडीच्या दिवशी वारकऱ्यांना कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी मनोगत व्यक्त केले.

हरोळे येथील श्री विठ्ठल रुक्मीणी मंदिरात गेली ५० वर्षे हा सप्ताह सुरु आहे. या ठिकाणी काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायन,



पसायदान, भजन, प्रवचन, कीर्तन त्याचबरोबर जिल्ह्यातील किर्तनकारांनी आपल्या अमृत वाणीतून वारकरी यांस मंत्रमुग्ध केले.

दरम्यान, वारकरी संप्रदायाच्यावतीने स्वमंतक मणीची कथा सांगत भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच, वेद, पुराणे व प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले.

## डेरवली शाळेत गोपाळकाला साजरा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील डेरवली येथील राजिपच्या शाळेत आनंददायी शनिवार अंतर्गत शिक्षक दिन व गोपाळकाला उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत लहान वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध आनंददायी व शैक्षणिक कृती घेतल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, आत्मविश्वास, सहकार्य आणि जबाबदारीची भावना विकसित झाली. तसेच, श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने सर्व विद्यार्थी राधा-कृष्ण व गोविंदा यांच्या वेशभूषेत शाळेत आले होते. सर्वांनी मिळून उत्साहात गोपाळकाला साजरा केला. पारंपरिक वेशभूषा, विविध कृती आणि सामूहिक सहभागामुळे शाळेचा परिसर आनंदाने आणि उत्साहाने भरून गेला.




## सातपाड्यात श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा जल्लोष

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या भक्ती भवाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. गावातील सात पाड्यांमध्ये मंदिरासह काही घरांमध्ये जन्मोष्टमीचा सोहळा पार पडला. धार्मिक श्रद्धेसोबतच गावाची जुनी सांस्कृतीक परंपरा जपणारा हा उत्सव ग्रामस्थांसाठी विशेष महत्त्वाचा ठरला.

श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त मंदिरामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मध्यरात्री श्रीकृष्ण जन्माचा सोहळा पार पडताच, भक्तांनी जयघोष करीत आनंद व्यक्त केला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक



तसेच बालगोपाळांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

जन्माष्टमीनंतर गोपाळकाला उत्सवाची चिरनेरसह उरण तालुक्यात धूम पाहायला मिळाली. यावेळी विविध ठिकाणी फुलांनी सजविलेल्या दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या.

ग्रामीण भागातील गोविंदा पथकांनी तीन ते चार थरांचे मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्याचा थरार अनुभवला.

**सुमारे २५ गोविंदा पथकांचा सहभाग** | **जय हनुमान गोविंदा पथकाचा जल्लोष**

# नागोठण्यात रंगला दहीहंडीचा थरार

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

किशोरशेठ जैन मित्र मंडळाच्यावतीने नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शनिवारी (दि.६) दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळ‍ सुमारे २५ गोविंदा पथक सहभागी झाले होते. यावेळी दहीहंडी फोडण्याचा मान आमडोशीतील जय हनुमान गोविंदा पथकाला मिळाला.

या दहीहंडी सोहळ्याचे आयोजन किशोरशेठ जैन मित्र मंडळाचे किशोर जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विभागीय नेते नरेंद्र जैन, भाई टके, शिवराम शिंदे, विलास चौलकर, नागोठण्याच्या सरपंच सुप्रिया


■ (छायाचित्र : महेश पवार)

महाडिक, नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक रविंद्र पारखे, संजय भोसले, प्रकाश जैन, संजय महाडिक, हरेश टके, मंगेश तेरडे, अतुल काळे, राजू टेमकर, दहीहंडी महोत्सवाचे अध्यक्ष ॲड. रमेश जाधव, कार्यवाहक जितेंद्र जाधव, धनंजय जगताप, प्रकाश कांबळे, मनोज टके, घनश्याम ताडकर आदींसह उत्सव समितीतील सर्व पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य यांसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

या दहीहंडी उत्सवात सात थरांची सलामी देणाऱ्या आमडोशी येथील जय हनुमान गोविंदा पथकाला पथकाला ५५ हजार ५५५ रुपयांचे रोख पारितोषिक आणि गदा असलेले आकर्षक चषक देण्यात आले. तसेच, पाच थरांची सलामी देणारे नागोठण्यातील श्री जोगेश्वरी नगर गोविंदा पथक, श्री चौंडेश्वरी माता गोविंदा पथक वरवठणे, जय हनुमान गोविंदा पथक आमडोशी, श्री बापदेव गोविंदा पथक वणी व श्री जाखमाता नवतरुण गोविंदा पथक वेलशेत यांना प्रत्येकी २ हजार ५२५ रुपयांचे पारितोषिक व चषक देण्यात आले. या संपूर्ण दहीहंडी सोहळ्यादरम्यान अलिबाग येथील गायक महेश पाटील, शलाका पंडित, फनी गेम फेम विनोद नाईक यांनी आपल्या कलेतून उपस्थितांचे मनोरंजन केले. तसेच, पाली येथील ओम साई डान्स अकॅडमीचीच्या कलाकारांनी अनेक सदाबहार समूह नृत्य व स्थानिक बाल कलाकारांनी वैयक्तिक नृत्य सादर करून दहीहंडी उत्सवात रंगत आणली.


■ गोकुळाष्टमीनिमित्त खांदा वसाहतीत गोविंदा पथकांच्या सलामीच्या थरांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी कळंबोलीच्या साईनाथ मित्र मंडळाने पाच थरांची मानवी रचना करून उपस्थितांची दाद मिळविली. (छायाचित्र: राजेश डांगळे)


■ पाली देऊळवाडा येथे पारंपरिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. (छायाचित्र: भूषण सुतार)


■ गोकुळाष्टमीनिमित्त पनवेलच्या छत्रपती शिवाजी चौकात गोविंदा मंडळांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. यावेळी कोणी पाच तर कोणी सहा थरांचे मानवी मनोरे रचत थरावर थर चढविण्याची चुरस रंगली होती. तसेच, गोविंदा पथकांच्या गाण्यांच्या तालावर तरुणाईने ठेका धरला. (छायाचित्र: राजेश डांगळे)


■ उरण तालुक्यातील पिरकोन येथील वाघेश्वर गोविंदा पथक व जरी मरी आई गोविंदा पथकाने थरांवर थर रचून दहीहंडी उत्सव साजरा केला. (छायाचित्र: दत्तात्रेय म्हात्रे)

# नवी मुंबई विमानतळावरून आंतरराष्ट्रीय कार्गो उड्डाणांचा वेग

**लॉजिस्टिक हबच्या दिशेने वाटचाल**

**एकाच दिवशी पाच विमानांचे आगमन**

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रवासी वाहतुकीसोबतच आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने पुढे येत आहे. नुकतेच एकाच दिवशी पाच मालवाहू विमानांनी विमानतळावर यशस्वीपणे आगमन केले आहे. त्यामध्ये अबुधाबीहून सुमारे ४६ टन विशेष माल घेऊन आलेल्या महाकाय अँटोनोव्ह एएन-१२४ 'रुस्लान'सह बोईंग ७७७, एअरबस ए३३० आणि बोईंग ७३७ या प्रकारच्या मालवाहू विमानांचा समावेश होता. या हालचालींमुळे नवी मुंबई विमानतळाच्या मालवाहतूक क्षमतेकडे आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक आणि लॉजिस्टिक क्षेत्राचे



लक्ष वेधले गेले आहे.

अँटोनोव्ह एएन-१२४ सारखे अवजड मालवाहू विमान हाताळण्यासाठी धावपट्टी, विमानतळावरील जागा, विमानतळ वाहतूक नियंत्रण तसेच जमिनीवरील माल हाताळणी यंत्रणेची सक्षम तयारी आवश्यक असते. एकाच दिवशी विविध प्रकारच्या पाच मालवाहू विमानांचे संचालन झाल्याने नवी मुंबई विमानतळावरील या यंत्रणांची प्रत्यक्ष क्षमता तपासली गेली. नवी मुंबई विमानतळाच्या कार्गो व्यवस्थेला आता आंतरराष्ट्रीय सेवांची जोड मिळत आहे. हाँगकाँग एअर कार्गोने ऑगस्टमध्ये नवी मुंबईतून समर्पित मालवाहू सेवा सुरू केली असून, इतर आंतरराष्ट्रीय मालवाहू कंपन्यांच्याही सेवा वाढत आहेत. यामुळे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील मालवाहतुकीचा काही भार नवी मुंबईकडे वळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नवी मुंबई विमानतळाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जेएनपीए बंदर, महामार्गांचे जाळे आणि अटल सेतूशी असलेली जोडणी. बंदरातून येणारा माल रस्ते मार्गाने विमानतळावर आणून तेथून हवाई मार्गाने परदेशात पाठविण्याच्या 'सी-टू-एअर' वाहतुकीला या जोडणीमुळे चालना मिळू शकते. विशेषतः वेळेचे महत्त्व असलेल्या औषधे, नाशवंत कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्न आणि उच्च मूल्याच्या मालासाठी ही व्यवस्था उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई विमानतळाच्या अधिकृत माहितीनुसार, प्रारंभिक टप्प्यात सुमारे ५ लाख मेट्रिक टन वार्षिक कार्गो हाताळणीची क्षमता नियोजित आहे. पुढील टप्प्यांमध्ये ही क्षमता आणखी वाढविण्याचे नियोजन आहे. या कार्गो सुविधेमुळे पनवेल, उरण, तळोजा औद्योगिक क्षेत्र, द्रोणागिरी आणि परिसरातील गोदामे, शीतगृहे, वाहतूक तसेच लॉजिस्टिक व्यवसायांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. कोकणातील फळे, भाजीपाला, समुद्री उत्पादने, प्रक्रिया केलेले अन्न आणि औषधनिर्मिती क्षेत्रातील मालाला जलद आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची क्षमता या हवाई मालवाहतूक केंद्रात आहे. मात्र, विमानतळाच्या वाढत्या कार्गो हालचालींबरोबरच प्रत्यक्ष किती टन माल हाताळला जात आहे, महिन्याला किती कार्गो उड्डाणे होत आहेत आणि त्यातील आयात-निर्यातीचे प्रमाण किती आहे, याची अधिकृत आकडेवारी समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे. ही आकडेवारी उपलब्ध झाल्यास नवी मुंबई विमानतळ प्रत्यक्षात किती वेगाने आंतरराष्ट्रीय लॉजिस्टिक केंद्र म्हणून विकसित होत आहे, याचे अधिक स्पष्ट चित्र समोर येईल.

## निवडक

### राजेश मेचकर यांना आदर्श पुरस्कार



**नेरळ :** रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. त्यात कर्जत तालुक्यातील मार्गाची वाडी या शाळेचे शिक्षक राजेश मेचकर यांना प्राथमिक विभागाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण दि.१० सप्टेंबर रोजी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे होणार आहे. राजेश मेचकर २००५ पासून शिक्षक म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या सेवेत आहेत. त्यांनी मेचकरवाडी येथे तब्बल १४ वर्षे सेवा बजावली आहे. मेचकरवाडी शाळेला डिजिटल बनवण्यापासून लोकवर्गणीतून शाळेचे इमारतीला कुंपण घालण्याचे काम, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस आणि खेळातून शिक्षण हि संकल्पना राबवताना सर्व खेळांचे साहित्य या शाळेत उपलब्ध आहे. त्यानंतर पाथरज या जिल्हा परिषद शाळेत सेवा बजावताना आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी जादा तासिका घेणे, शिष्यवृत्ती साठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे यावर भर दिला आहे.



### खालापुरात शिक्षक दिनाचे आयोजन

**पाताळगंगा :** ''आई-वडील जन्म देऊन संगोपन करतात; मात्र, शिक्षक विद्यार्थ्यांना जीवन जगण्याची योग्य दिशा देतात. शिक्षक केवळ पुस्तकातील धडे शिकवत नाहीत, तर प्रामाणिकपणा, शिस्त, संस्कार, वेळेचे महत्त्व आणि चांगला माणूस होण्याची शिकवण देतात. त्यामुळे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी शिक्षकांचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, असे गौरवोद्गार सभापती कृष्णा पारंगे यांनी व्यक्त केले. यावेळी भारताचे महान शिक्षक, तत्त्वज्ञ व माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि.५) शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्य गौरी गडगे, प्रमिला पाटील, कमला भस्मा, देवयानी देशमुख, जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे, रेश्मा पाटील, सामाजिक कार्यकर्ते कैलास म्हात्रे, महादेव गडगे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, गटशिक्षणाधिकारी राजवर्धन नाईक, पोषण आहार अधीक्षक दीपा परब, वरिष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास आदी उपस्थित होते. सभापती कृष्णा शेठ पारंगे यांच्या संकल्पनेतून शिक्षक दिनानिमित्त खालापूर तालुक्यात गेल्या २५ वर्षांत प्रथमच शिक्षक गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील प्रत्येक केंद्रातून दोन ज्येष्ठ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, तालुक्यातील सर्व शिक्षकांना आदर्श शिक्षक प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

### 'शिक्षकच समाजाचे खरे मार्गदर्शक'



**चिरनेर :** रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात शिक्षक दिन तथा डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी स्टाफ वेल्फेअर कमिटीतर्फे आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर म्हणाले की, अशैक्षणिक कामांच्या ओझ्याने प्राथमिक शिक्षणाची हेळसांड चालू असताना महाविद्यालयीन स्तरावर शिकवणाऱ्या शिक्षकांची जबाबदारी वाढलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी, कौशल्य विकास,भारतीय ज्ञान परंपरेचे पुनरुज्जीवन आणि संशोधन यांसारख्या अनेक गोष्टींची आव्हाने समोर असताना उच्च शिक्षण क्षेत्रात काम करत असणारे शिक्षकांची जबाबदारी आणि उत्तरदायित्व मोठे आहे, त्याकरिता शिक्षकांनी स्वतःचा व्यासंग वाढवणे आवश्यक आहे. समाजात अजूनही शिक्षकांकडे आशेने पाहिले जाते. देशाचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी आजही शिक्षकांकडेच आशेचा किरण किंवा खरे मार्गदर्शक म्हणून बघितले जात आहे, असेही ते म्हणाले.



● मुरुड जैन समाजाच्या चातुर्मासात शत्रुंजय तीर्थ भाव यात्रा काढण्यात आली. ही भाव यात्रा गुरुमाताच्या मार्गदर्शनाखाली मुरुड शहरातून काढण्यात आली. समाजाचे अध्यक्ष हसमुख जैन आणि सर्व समाजबांधव व महिला आनंदाने सामील झाल्या होत्या. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## शिष्यांची गुरूंना भावनिक गुरुदक्षिणा



| रसायनी | प्रतिनिधी |

शाळा सुटली, आयुष्याची वाट बदलली; पण गुरुंचे संस्कार आणि आठवणी मनातून कधीच सुटल्या नाहीत. याच भावनेतून सरनौबत नेताजी पालकर विद्यालय, चौक येथील सन १९९४-९५च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी चौक विभागातील वावर्ले येथील तुषार फार्महाऊसवर आयोजित केलेला माजी शिक्षक सन्मान व स्नेहमेळावा अत्यंत भावस्पर्शी वातावरणात पार पडला. यावेळी इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंत ज्यांनी या विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि जीवनाची दिशा दिली, त्या अरुणा शहासने, रसिका अंबावणे, संगीता साखरे, ए.आर. पाटील, देवानंद कांबळे, पी.एस. पाटील, सुरेश वाघमोडे, वाली कुंभार, आप्पासाहेब पवार, राजाराम नलावडे, गणपत पडारी आणि शरद घोघरे यांचा सन्मान करण्यात आला. या स्नेहमेळाव्यात सचिन कालेकर, सचित भालेकर, तुषार येवले, शरद सोनवळकर, विष्णू मांडे, नंदू माळी, प्रभाकर काठावळे, राकेश बळी, चंदर धनगर, रोहिदास कुंभार, किशोर मांडे, हरिश्चंद्र पार्ठे, राकेश धनराज, दत्ता मालुसरे, विकास कांबळे, लता खंडागळे, वृषाली कदम, साधना म्हात्रे, योगिता मोरे, लता बागडे, रजनी बाविस्कर, लीला माळी, मनीषा झेमसे, शांती जितेकर, कविता साखरे., लीना सखारे, आशा कुंभार, वर्षा, भक्ती ठाकरे आणि अजय झिंगे यांच्यासह माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या दरम्यान, विद्यार्थ्यांनी आपापल्या जीवनप्रवासाची माहिती गुरुजनांना देली. तसेच, कधीकाळी वर्गात शिकविलेली मुले आज विविध क्षेत्रांत उभी असल्याचे पाहून शिक्षकांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे भाव उमटले, तर जुन्या आठवणींनी अनेकांचे डोळे पाणावले.

## पनवेलमधील रस्ते खड्ड्यांत

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेल शहर खड्डेमुक्त होणार कधी, असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे. शहरातील अनेक रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असताना रायगड बाजारकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग अक्षरशः खड्ड्यांच्या जाळ्यात अडकला आहे. गणेशोत्सवाला आता अवघे काही दिवस शिल्लक असताना या रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. हे लहान-मोठे खड्डे वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असून, पावसाचे पाणी साचल्यानंतर खड्ड्यांचा अंदाजही येत नाही.

## भूखंड वाटपाच्या प्रक्रियेला पुढचा टप्पा

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

नवी मुंबईतील विविध नोडमध्ये समग्र शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये उभारण्यासाठी भूखंड उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेला सिडकोने पुढील टप्प्यावर नेले आहे. सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळावरील ताज्या नोंदीनुसार, अर्ज केलेल्या संस्थांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सिडकोच्या संकेतस्थळावर ही नोंद दर्शविण्यात आली आहे.

सिडकोने नवी मुंबईतील विविध ठिकाणी इंग्रजी किंवा स्थानिक माध्यमातील समग्र शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यासाठी भूखंड भाडेपट्ट्याने देण्याची योजना राबवली होती. या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांनंतर आता अर्जदार संस्थांची यादी सार्वजनिक करण्यात आली आहे. त्यामुळे कोणत्या संस्था सिडकोच्या या योजनेत सहभागी झाल्या आहेत, याची माहिती नागरिकांना उपलब्ध झाली आहे.

या योजनेत नवी मुंबई, पनवेल आणि उरण मधील द्रोणागिरी, घणसोली, उलवे, तळोजा आणि कामोठे या भागांतील भूखंडांचा समावेश असल्याचे उपलब्ध योजनेच्या कागदपत्रातून दिसून येते. संबंधित भूखंडांवर शैक्षणिक संस्था उभारण्याचा प्रस्ताव आहे. योजनेच्या कागदपत्रानुसार द्रोणागिरी सेक्टर ५९, घणसोली सेक्टर १४, उलवे सेक्टर १९, तळोजा सेक्टर २६, २९ व ३१ तसेच कामोठे सेक्टर २७ व ३२ येथील भूखंडांचा समावेश होता. त्यामुळे या प्रक्रियेतून नवी मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सिडकोच्या संकेतस्थळावरील ताज्या नोंदीत अर्जदारांची यादी प्रसिद्ध झाल्याने आता भूखंड वाटपाची पुढील प्रक्रिया कोणत्या पद्धतीने राबविली जाणार आणि कोणत्या संस्थांना अंतिम मंजुरी मिळणार, याकडे लक्ष लागले आहे. अर्जदार संस्थांचे गुणांकन, पात्रता आणि अंतिम निवड याबाबत सिडकोकडून पुढील अधिकृत माहिती प्रसिद्ध होणे अपेक्षित आहे.

## मंगळागौर स्पर्धेत सरस्वती विद्यालय प्रथम

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरातील महिलांनी मैत्री ग्रुप स्थापन केला असून, या ग्रुपच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. यंदाही श्रावण महिन्यात शहरातील महिला तरुणींसाठी मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा शहरातील असेम्ब्ली हॉलच्या पटांगणावर पार पडली. यावेळी ही स्पर्धा सरस्वती विद्यालयाच्या ग्रुपने जिंकली.



या स्पर्धेच्या सुरूवातीला हिरकणी ग्रुपने गणेशावंदना सादर करून सुरवात केली. यावर्षी प्रथमच माथेरान डोंगरातील आदिवासी वाड्यांमधील महिला आणि तरुणी यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यात नाविन्य म्हणजे कशाच्या पट्टीच्या आदिवासी महिलांनी देखील सहभाग घेत स्पर्धेला रंग भरला. यावेळी परीक्षक म्हणून मुंबई वरून आलेल्या ''स्वर्गापेक्षा सुंदर आसा आमचो हयो कोकण'' या गाजलेल्या गाण्याच्या सह गायिका उज्वला सुकाळी आणि श्रीलक्ष्मी सावंत या उपस्थितीत होत्या. या स्पर्धेत एकूण सात ग्रुप स्पर्धेमध्ये उतरले होते. तसेच, सूत्रसंचालन स्नेहा चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला माथेरानमधील सर्व समाजातील महिलांनी आणि तरुण मुलींनी उपस्थिती दर्शवली. सामाजिक एकोपा टिकून राहावा यासाठी मैत्री ग्रुप तर्फे प्रत्येक समाजातील महिला अध्यक्षांचा आणि नगरसेविकेंचा सत्कार करण्यात आला.

## बाधित व्यावसायिकांमध्ये तीव्र असंतोष

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने शहरातील मुख्य बाजारपेठेत अनधिकृत फेरीवाले, टपऱ्या तसेच आस्थापना लगतचे बेकायदेशीर शेड व पायऱ्यांवर नुकतीच धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेमुळे बाजारपेठेतील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असला, तरी या कारवाईमुळे आता बाधित व्यावसायिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. ''केवळ लहान व्यावसायिकांवरच कारवाई का?'' असा प्रश्न उपस्थित करत बाधितांनी आता प्रशासनाकडे एकमुखी मागणी लावून धरली आहे.



श्रीवर्धन नगरपरिषद व पोलीस प्रशासनाकडून शहरातील बाजारपेठेत गेल्या काही दिवसांपासून धडक कारवाई सुरू आहे. याठिकाणी असलेले अनधिकृत फेरीवाले, टपऱ्या तसेच आस्थापना लगतचे बेकायदेशीर शेडवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे बाजारपेठेतील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. मात्र, या कारवाईमुळे बाधित व्यावसायिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. शहरातील मोठ्या टोलेजंग इमारतींनी नगरपरिषदेची बांधकाम परवानगी, विकास नियंत्रण नियमावलीचे नकाशे मंजूर न करता किंवा वापर परवाना न घेता बेकायदेशीर बांधकामे केली आहेत, त्यांच्यावरही तात्काळ कारवाई करण्यात यावी. याशिवाय, श्रीवर्धन समुद्रकिनारा परिसरात सीआरझेड नियमांचे सर्रास उल्लंघन करून उभारण्यात येणाऱ्या रिसॉर्ट्सवर कारवाईची मागणी जोर धरत आहे. या रिसॉर्ट चालकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ नोंदणी, पर्यावरण विभागाची मंजुरी तसेच अग्निशामक दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेताच अनधिकृत बांधकामे उभी केली आहेत. त्यामुळे ''नियम आणि कायदा सर्वांसाठी समान असावा. जर छोट्या टपऱ्या आणि शेडवर त्वरित कारवाई होते, तर सीझेडसीआरचे नियम तुडवणारे बडे रिसॉर्ट व्यावसायिक आणि परवानग्या नसलेल्या मोठ्या इमारतींवर प्रशासन कधी कारवाई करणार?'' असा प्रश्न बाधित व्यावसायिकांनी विचारला आहे. आता नगरपरिषद व पोलीस प्रशासन या बेकायदेशीर हॉटेल आणि इमारतींवर मोहीम उघडणार का, याकडे संपूर्ण श्रीवर्धनकरांचे लक्ष लागले आहे.

## 'शिक्षकांचा व्याप कमी करणार'

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

''शिक्षक हा विद्यार्थी, शाळा आणि गावाच्या विकासातील महत्त्वाचा दुवा आहे. विद्यार्थ्यांना घडविण्याचे मुख्य काम शिक्षकांचे असून, त्यांच्यावर असलेला अतिरिक्त कामांचा व्याप कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे यांनी व्यक्त केले. खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांच्या पुढाकाराने शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मराठी शाळांमधील शिक्षकांवर अध्यापनाबरोबरच विविध शासकीय कामांची जबाबदारी येते. त्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शिक्षकांना शाळेत विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देताना पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांचा अनावश्यक व्याप कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ते म्हणाले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट- २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन- २ जागा, नाईट सिक्युरिटी-२, हाऊसकीपर- फक्त पुरूष (३ जागा), ओरिएंटल कुक- १ जागा, इंडियन चायनीज कुक-१ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक : ७५५९१८४६१२

● महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जागा भाड्याने देणे आहे. १२०० स्क्वेअर फुट दूकानाचे तीन गाळे भाड्याने देणे आहे. ७०३८६५६४४६

● नागाव येथे रोडटच ६ गुंठे जागा विकणे आहे. तार कंपाऊंड मारले आहे. संपर्क- ७०३८६५६४४६

● नागाव येथे रिसॉर्ट मध्ये अकाउंटन्ट या पोस्ट साठी कामाला मुलगी पाहिजे आहे. कमीत कमी १ वर्षाचा टॅली (Tally) हाताळल्याचा चा अनुभव पाहिजे. इच्छुकांनी खाली दिलेल्या नंबर वरती कॉन्टॅक्ट करावा आणि आपला रिस्युम पाठवावा. मोबाईल नंबर. +९१९८१९०९३३२०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**बाजारपेठेत सजावटीच्या साहित्यांची रेलचेल** | **दागिने, साड्या, आकर्षक वस्तूंच्या खरेदीसाठी महिलांची लगबग**

## गणरायासोबतच गौरी आगमनाचे वेध

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

गणेशाच्या आगमनाचे वेध आता पनवेलकरांना लागले असून, गणरायाच्या आगमनाबरोबरच महिला वर्गाला आता गौरी आगमनाचेही वेध लागले आहेत. त्यामुळे गौरीच्या स्वागतासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंच्या खरेदीसाठी पनवेलच्या बाजारपेठेत महिलांची लगबग वाढू लागली आहे.

बाप्पाच्या आगमनासह गौराईच्या स्वागतासाठी सजलेली पनवेलची बाजारपेठ सणोत्सवाच्या रंगात रंगून गेली आहे. पनवेलमधील प्रमुख बाजारपेठेतील दुकाने सध्या रंगीबेरंगी सजावटीच्या साहित्याने सजली आहेत. गौरीसाठी आकर्षक



### बाजारपेठांमध्ये सणोत्सवाचे चैतन्य

बाजारपेठांमध्ये सध्या सणोत्सवाचे चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दुकानदारांनीही गणेशोत्सव आणि गौरीपूजनाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून ठेवले आहे. काही ठिकाणी सजविलेल्या गौराई पाहण्यासाठी नागरिकांचीही गर्दी होत आहे. लहान मुलांपासून महिलांपर्यंत सर्वच जण सणाच्या तयारीत व्यस्त असल्याचे चित्र आहे.


साड्या, विविध प्रकारचे दागिने आणि पारंपरिक सजावटीच्या वस्तू दुकानांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. सुंदर हार, बांगड्या, मंगळसूत्र, नथ, कानातील दागिने आणि अन्य आकर्षक साहित्य महिलांचे लक्ष वेधून घेत आहे. तसेच, गौरीच्या सजावटीसाठी लागणारे विविध रंगांचे कापड, फुले आणि सजावटीच्या वस्तूंचीही मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे. काही दुकानांमध्ये आकर्षक पद्धतीने सजविलेल्या गौराई नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत. पारंपरिक पद्धतीने गौरीचे स्वागत करण्यासाठी महिला वर्गाने आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. गौरीला सुंदर साडी नेसविण्यापासून ते आकर्षक दागिन्यांनी सजविण्यापर्यंत विविध साहित्याची खरेदी केली जात आहे.

यंदा पारंपरिकतेबरोबरच आधुनिक सजावटीच्या वस्तूंनाही महिला वर्गाची पसंती मिळत आहे. गणेशोत्सव जवळ येत असल्याने बाजारपेठेत दिवसेंदिवस गर्दी वाढत आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने बाजारात येत आहेत.

विनायक दळवी

# कबड्डी परंपरेतील तारा निखळला

बँकेच्या लॉकर इतका तारक राऊळ सेफ होता. चढाईच्या वेळीआणि क्षेत्ररक्षणाच्या वेळीही तारकची चढाई चौफेर असायची. त्यात विविधता होती म्हणूनच तारकला कुणी जोखू शकले नाहीत. तारक डाव्या कोपऱ्यात चढाईला येईल म्हणून क्षेत्ररक्षण लावावे तर नेकमा तारक उजव्या कोपऱ्यात चढाई टाकायचा. बऱ्याच जणांची अशी फसगत व्हायची. तांत्रिकदृष्ट्या तारकची चढाई परिपूर्ण होती. हातापायांचा चढाईच्यावेळी योग्य तऱ्हेने वापर करणारे मोजकेच कबड्डीपटू झाले. त्यात तारकचा समावेश होतो. तारकचा खेळ व गुण काढण्याची पद्धत तंत्रशुद्ध होती. गॅलरी गेमपेक्षा तारक एक-एक गुण टिपून आणण्याला महत्त्व द्यायचा. त्यामुळे सामन्याच्या प्रारंभी हवी असलेली २-३ गुणांची आघाडी तारक चटकन मिळवून द्यायचा. ती आघाडी टिकविण्याची जबाबदारीही तारकच घ्यायचा.



तारक बोनसरेषाही चांगली करायचा. नंतर तारक जास्त चढाया टाकायचा. तारकचा पदन्यास (स्टेपिंग) चांगला होता. शाळेत लंगडी खेळायचो, त्यामुळे पदन्यास चांगला झाला, असे तारक म्हणायचा. तारकच्या चढाया या सुरक्षित (सेफ) चढाया असायच्या. सारे काही अलबेल असताना ही परिस्थिती होती. पण संघ मागे असला की, तारक प्रतिपक्षावर तुटून पडायचा. त्यांच्या चौफेर चढाईला वेग यायचा. सपासप बैठ्या लाथा मारायचा. गोंधळलेल्या क्षेत्ररक्षकांना हाताने टिपायचा. दादरच्या महाराष्ट्र हायस्कूलमध्ये असतानाही तारक असाच खेळायचा. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय कबड्डी स्पर्धातही तारक असाच खेळला. १९८१ साली तारक जिल्हा व राज्य संघातून निवृत्त झाला. पण आपल्या व्यावसायिक संघाचा, महिंद्रचा तो आजही आधारस्तंभ आहे. महिंद्रचा हुकमी खेळाडू सुनील जाधव जायबंदी असताना मुंबई महापौर कबड्डी स्पर्धेत यंदा तारकने संघाला पराभवाच्या खाईतून वर काढले. महिंद्रला त्यामुळेच विजेतेपद मिळविता आले. महिन्याभरात आरसीएफच्या राष्ट्रीय पातळीवरील कबड्डी स्पर्धेतही तारक चमकला होता. बलाढ्य पंजाब पोलिसांचे क्षेत्ररक्षण तारकने खिळखिळे केले होते. महिंद्राचा त्या लढतीत थोडक्यात विजय हुकला. तारक त्यावेळी एवढा चांगला खेळला तर ऐन उमेदीत त्याचा खेळ किती दर्जेदार झाला असेल त्याची कल्पना येते. फक्त चढाई हेच तारकचे भांडवल नव्हते. तर क्षेत्ररक्षणातही तो लपलेला हिरा होता. लपलेला यासाठी की तारक कोपरारक्षक किंवा मध्यरक्षकाच्या हाताला नेहमी असायचा. पण त्या जागेवरून त्यांची मुख्य खेळाडूला लाभलेली साथ मोलाची असायची. तारकचे हे कौशल्य बारकाईने अवलोकन केल्याशिवाय लक्षात येण्याजोगे नव्हते. पण त्याच्या प्रतिस्पर्ध्यांना मात्र ते ज्ञात होते. महाराष्ट्राचा एन. आय.एस. प्रशिक्षक फिदा कुरेशी म्हणायचा, हाताला सहायक क्षेत्ररक्षक कसा असावा याचे आदर्श उदाहरण तारक राऊळ हा खेळाडू होता. तो आजतागायतचा महाराष्ट्रातील, हाताचा सर्वोत्कृष्ट खेळाडू होता. खोलवर चढाई करणाऱ्या खेळाडूच्या पायात तो पडायचा. किंवा त्याच्या जांघेत हात घालून त्याचे दोन्ही पाय वर उचलायचा. त्यामुळे जमिनीचा आधारसंपर्क तुटलेला बलदंड खेळाडू गलितगात्र व्हायचा. रिझर्व्ह बँकेत तारकने आपली कारकीर्द सुरू केली. रघुनाथ नलावडेंचे मार्गदर्शन तारकला पुढे फारच उपयोगी पडले. तारकने त्या पुण्याईच्या बळावर मुंबई, महाराष्ट्र आणि भारतीय कबड्डी संघात स्थान पटकावले. शिवछत्रपती पुरस्कारही मिळवला. कबड्डीतील सारी मिळकत तारकने कबड्डी प्रशिक्षकाच्या रूपाने महाराष्ट्राला वाटली.जुन्या पिढीतले कबड्डीपटू दर्जेदार होतेच तसेच दिलदारही होते. त्यांनी आपल्यातली गुणवत्ता मुक्तहस्ते सहकाऱ्यांमध्ये वाटली. तारकही अशाच महान खेळाडूंपैकी एक होता. या दिवंगत खेळाडूला आदरांजली!

**- कबड्डीतील किमयागार या पुस्तकातून साभार**

महिला आशिया कप

# भारताच्या वाघिणींनी फोडली विजयाची हंडी

■ **पाकिस्तानवर ७ विकेटने विजय**

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आशिया कप २०२६ मधील ग्रुप स्टेजमधील ९ व्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ७ विकेटने पराभव करत विजयाची हंडी फोडली. भारताच्या वाघिणींनी या विजयासह स्पर्धतील आपला सलग तिसरा विजय नोंदवला. आशिया कपमध्ये भारताने सातव्यांदा पराभूत केले.



टॉस जिंकत पहिल्यांदा बॅटिंग करणाऱ्या पाकिस्तान संघाला ५५ धावांवर ऑल आऊट केले होते. भारताच्या फिरकीसमोर पाकिस्तानच्या फलंदाजांनी गुडघे टेकवले. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारताची सुरूवातही खराब झाली होती. पण दीप्ती शर्मा आणि हरमनप्रीत कौर यांनी सामना जिंकवला.

या सामन्यात पाकिस्तान संघाची कर्णधार फातिमा सना हिने प्रथम फलंदाजी करण्याच निर्णय घेतला होता. मात्र भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानची फलंदाजी ढेपाळली, अवघ्या ५५ धावांवरच भारतीय गोलदाजांना त्यांना गुंडाळले. पाकिस्तान संघाने त्यांच्या इतिहासातील सर्वात कमी धावसंख्या ठरली, याआधी ५६ होती मात्र आता ५५ धावांवरच त्यांचा डाव आटोपला. पाकिस्तानची सुरूवात चांगली झाली होती, कारण चार ओव्हरपर्यंत पाकिस्तानची धावसंख्या २२-० होती परंतु पाचव्या ओव्हरपासून पाकिस्तानला झटके बसायला सुरूवात झाली त्यानंतर त्यांना सावरता आली नाही. पाकिस्तानकडूनसलामीवीर मुनीबा अली १३ धावा आणि शवाल जुल्फिकारच्या १४ धावा सोडल्या तर त्यानंतर कोणालाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. कर्णधार फातिमा सनासुद्धा भोपळा फोडू शकला नाही. भारताकडून श्री चरणी आणि प्रेमा रावल यांनी प्रत्येकी ३-३ विकेट घेत पाकिस्तान संघाला बॅकफूटवर ढकलले. त्यासोबतच दीप्ती शर्माने २ आणि शेफालीने १ विकेट नावावर केली.

पाकिस्तानच्या छोट्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरूवात खराब झाली. पाकिस्तानची कर्णधार फातिमाने तीन झटके देत सामन रंगतदार करण्याचा प्रयत्न केला होता. शेफाली वर्मा १२ धावा, स्मृती मानधना ९ धावा आणि प्रतिका रावल हिला ४ धावांवर आऊट केले होते. त्यानंतर मैदानात कर्णधार हरमनप्रीत कौर आणि अनुभवी दीप्ती शर्मा यांनी विकेटवर थांबून राहत नाबाद २८ धावांची भागीदारी केली आणि विजय खेचून आणला. कर्णधार म्हणून १५०वा सामना खेळणाऱ्या हरमनप्रीतने कडक षटकार मारत विजय साकारला. हरमनप्रीतने नाबाद १८ आणि दीप्तीने नाबाद १४ धावा केल्या.

दरम्यान, या विजयासह भारताने ग्रुप स्टेजमधील तिन्ही सामने जिंकले. या तीन विजयांसह भारताचे सहा गुण झाले असून भारताने दुसरा सामना जिंकल्यावरच सेमी फायनलमध्ये आपले स्थान पक्के केले होते. आत तिसऱ्या विजयासह भारतीय संघ अजिंक्य राहिला आहे.

# सात्विक-चिराग चायना मास्टर्सच्या फायनलमध्ये

## जेतेपदासाठी चीनच्या जोडीशी भिडणार

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताची स्टार बॅडमिंटन जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी चायना मास्टर्सच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या भारतीय जोडी सात्विक आणि चिराग यांनी शानदार कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या सेटमध्ये थोड्या विश्रांतीनंतर, त्यांनी १ तास ५ मिनिटे चाललेल्या सामन्यात २९व्या क्रमांकावरील मलेशियन जोडीचा २१-१५, १८-२१, २१-११ असा पराभव केला. यापूर्वी ही जोडी २०२३ आणि २०२५ मध्ये याच स्पर्धेत उपविजेती ठरली होती. या सामन्यापूर्वी, सात्विक आणि चिराग यांचा मलेशियन जोडीविरुद्ध २-० अशी विजयाची नोंद केली होती. त्यांनी २०२४ च्या थायलंड ओपन आणि २०२५ च्या मलेशिया ओपनमध्ये त्यांना पराभूत केले होते.



मध्यंतरापर्यंत सात्विक-चिराग ११-९ ने आघाडीवरसामन्याच्या सुरुवातीला भारतीय जोडी ०-५ ने मागे होती, परंतु सात्विक आणि चिरागने सलग सात गुण मिळवून शानदार पुनरागमन केले. या काळात ३४ शॉट्सची एक मोठी रॅलीसुद्धा पाहायला मिळाली, ज्यामुळे भारताला ७-५ अशी आघाडी घेण्यास मदत झाली. मलेशियन नूरच्या चुकांचा फायदा घेत भारतीय जोडीने १०-६ अशी आघाडी घेतली. सात्विक आणि चिरागकडूनही काही चुका झाल्या असल्या तरी, मध्यंतरापर्यंत (ब्रेक) ते ११-९ ने आघाडीवर होते. मध्यंतरानंतर, सात्विकच्या दमदार स्मॅशमुळे भारतीय जोडीने १५-१२ अशी आघाडी घेतली. त्यानंतर, टॅनच्या आणखी एका चुकीनंतर भारताने १७-१२ अशी आघाडी घेतली. जेव्हा स्कोअर १८-१५ होता, तेव्हा दोन्ही जोड्यांमध्ये ५४-शॉटची रॅली झाली. यादरम्यान, मलेशियाचा खेळाडू जमिनीवर पडूनही रॅली सुरू ठेवत होता, पण त्याचा शॉट अखेरीस कोर्टच्या बाहेर गेला.

त्यानंतर नूरने आणखी एक शॉट चुकला, ज्यामुळे भारताला पाच गेम पॉईंट्स मिळाले. सात्विक आणि चिरागने दुसऱ्या गेम पॉईंटवर पहिला गेम जिंकला. मलेशियन जोडीने पुन्हा वेगवान सुरुवात करत दुसऱ्या गेममध्ये ४-० अशी आघाडी घेतली. परंतु, सात्विक आणि चिरागने एका शानदार फ्लिक सर्व्हने पुनरागमन करत स्कोअर ५-५ असा बरोबरीत आणला. त्यानंतर दोन्ही जोड्यांनी क्रॉस-कोर्ट रिटर्न्स आणि जोरदार स्मॅशची रॅली खेळली. ब्रेकनंतर भारतीयांनी नूरच्या चेंडूवर अचूक स्मॅश मारून स्कोअर १३-१३ असा बरोबरीत आणला.

ज्युनिअर आशियाई चषक महिला हॉकी स्पर्धा

# दक्षिण कोरियावर ४-१ अशी मात

■ **भारतीय महिलांचीही विजयी सुरुवात**

**| मोकी, चीन | वृत्तसंस्था |**

महिला ज्युनिअर आशियाई चषक हॉकी स्पर्धेत जेतेपद राखण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाने आपल्या मोहिमेची दणकेबाज सुरुवात केली आहे. शनिवारी झालेल्या पहिल्या सामन्यात भारतीय महिला संघाने दक्षिण कोरियावर ४-१ अशी मात केली.

सानिका चंद्रकांत माने, पूर्णिमा यादव, पूजा साहू आणि मधू सिदार यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाच्या या विजयात मोलाचे योगदान दिले. गेल्या दोन आवृत्यांचे विजेतेपद भूषवणाऱ्या भारतीय संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक चढायांवर भर दिला. सामन्याच्या आठव्या मिनिटाला सानिकाने मैदानी गोल नोंदवून भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करण्यात भारताला यश आले नाही, तरीही



३० व्या मिनिटाला पूर्णिमा यादवने सुरेख गोल करत मध्यंतरापूर्वी भारताची आघाडी २-० अशी भक्कम केली.

तिसऱ्या सत्राच्या अखेरीस मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर पूजा साहूने गोल डागून धावसंख्या ३-० केली. त्यानंतर ५१ व्या मिनिटाला मधू सिदारने चौथा गोल करत भारताला ४-० अशी मजबूत स्थिती प्राप्त करून दिली. कोरियाच्या के. आय. एल. गाबिनने ५७व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर एक गोल नोंदवून पराभवातील अंतर कमी केले.

ज्युनियर पुरुष हॉकी आशियाड स्पर्धा

# भारताचा १४-० ने विजय



■ **इंडोनेशियाला हरवले, प्रभदीपने ५ आणि अनमोलने ४ गोल केले**

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|**

भारताच्या ज्युनियर पुरुष हॉकी संघाने चीनमधील मोकी येथे ज्युनियर आशिया कप २०२६ ची सुरुवात १४-० च्या मोठ्या विजयाने केली. ग्रुप ए मधील पहिल्या सामन्यात भारताने इंडोनेशियाला हरवले. प्रभदीप सिंगने सर्वाधिक ५ गोल केले आणि त्याला प्लेअर ऑफ द मॅच म्हणून निवडण्यात आले.

भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ दाखवला आणि इंडोनेशियावर सतत दबाव ठेवला. प्रभदीपने ५व्या मिनिटाला गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर हरपालने ८व्या मिनिटाला गोल करून स्कोअर २-० केला.इंडोनेशियाला भारतीय संघाच्या वेगवान हल्ल्यांचा आणि सततच्या हालचालींचा सामना करता आला नाही. पहिल्या क्वार्टरच्या अखेरपर्यंत भारत २-० ने आघाडीवर होता.दुसऱ्या क्वार्टरमध्ये कर्णधार अनमोलने १६व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकवर गोल केला. यानंतर चार मिनिटांनी अजित यादवने गोल करून भारताची आघाडी ४-० अशी केली.प्रभदीपने २६व्या आणि ३०व्या मिनिटाला गोल करून आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली. हाफ-टाइमपर्यंत भारत ६-० ने आघाडीवर होता.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये अनमोलने ३५व्या आणि ४२व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले. यानंतर तिसरा क्वार्टर संपण्यापूर्वी प्रभदीपने आणखी एक गोल केला. यामुळे स्कोअर ९-० झाला.शेवटचा क्वार्टर सर्वाधिक गोल करणारा ठरला. अनमोलने ५१व्या मिनिटाला आपला चौथा गोल केला. त्यानंतर एका मिनिटाने प्रभदीपने सामन्यातील पाचवा गोल केला.अजित यादवने ५३व्या मिनिटाला २ गोल करून आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली आणि भारताची आघाडी १३-० अशी केली. मौर्याने ५९व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवरून गोल करून स्कोअर १४-० असा केला.भारताने सामन्यात ९ फील्ड गोल, ४ पेनल्टी कॉर्नर आणि १ पेनल्टी स्ट्रोकद्वारे गोल केले. अनमोलने ३ पेनल्टी कॉर्नर आणि १ पेनल्टी स्ट्रोकचे गोलमध्ये रूपांतर केले. मौर्याने चौथ्या सेट-पीसवरून गोल केला.

# नैनीझीलच्या लाटांवर रंगणार जलक्रीडेचा थरार

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

उत्तराखंडमधील नैनितालच्या प्रसिद्ध नैनीझीलमध्ये जलक्रीडा आणि साहसी खेळांचा थरार पाहायला मिळणार आहे. नैनिताल ॲक्टिक अँड ॲडव्हेंचर स्पोर्ट्स असोसिएशनच्यावतीने वार्षिक ॲक्टिक मीट आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत देशभरातील २०० हून अधिक जलतरणपटू आणि कयाकिंगपटू सहभागी होणार आहेत.तल्लीताल येथील नासा क्लब-सेंट जोसेफ बोट हाऊस येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पाच वयोगटांत रंगणार चुरसलहान मुलांपासून अनुभवी खेळाडूंपर्यंत सर्वांना सहभागी होता यावे, यासाठी स्पर्धेचे पाच वयोगट करण्यात आले आहेत.१० वर्षांखालील१० ते १४ वर्षे १५ ते २० वर्षे २१ ते ३० वर्षे ३१ ते ४० वर्षे यामुळे विविध वयोगटातील जलतरणपटूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. फ्रीस्टाइलपासून बटरफ्लायपर्यंत जलतरणाची कसोटीॲक्टिक मीटमध्ये जलतरणाच्या विविध प्रकारांमध्ये खेळाडू सहभागी होणार आहेत. यामध्ये फ्रीस्टाइल, ब्रेस्टस्ट्रोक, बटरफ्लाय आणि बॅकस्ट्रोक या प्रकारांचा समावेश आहे.नैनीझीलच्या पाण्यावर होणाऱ्या या स्पर्धेत खेळाडूंचा वेग, तंत्र आणि सहनशक्तीची कसोटी लागणार आहे.



# प्रीटोरियसची विश्वविक्रमी सेंच्युरी



**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेच्या संघातील युवा बॅटर लुआन-ड्रे प्रीटोरियस याने नामिबिया विरुद्धच्या सामन्यात आपल्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले अन् विश्वविक्रमी शतक झळकावले. प्रीटोरियसने अवघ्या ५३ चेंडूंत ५ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने १०१ धावांची खेळी केली. पूर्ण सदस्यत्व असलेल्या देशाकडून टी-२० आंतरराष्ट्रीय शतक करणारा तो सर्वात युवा फलंदाज ठरला आहे. त्याने अफगाणिस्तानच्या हजरतुल्लाह झाझाईचा विक्रम मोडला. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या. प्रत्युत्तरात नामिबियाच्या संघाला २० षटकांत ३ बाद २१७ धावांपर्यंतच मजल मारता आली.

# प्रभादेवीतील कबड्डी क्रीडा संकुलाला तारक यांचे नाव द्यावे: विशाखा राऊत

**| मुंबई | प्रतिनिधी |**

प्रभादेवीत कबड्डीचे क्रीडा संकुल तयार करून त्याला तारक यांचे नाव द्यावे. असे भाऊक उद्गार माजी महापौर विशाखा राऊत यांनी राष्ट्रीय खेळाडू तारक यांच्या शोकसभेत काढले.

ओम् कबड्डी प्रबोधिनी व प्रभादेवी मित्र मंडळ यांच्या विद्यमाने महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. च्या कबड्डीमहर्षी स्व. बुवा साळवी सभागृह, शिवाजी पार्क, दादर येथे आयोजित करण्यात आली होती. सौ. राऊत यांच्या मताशी सहमत होऊन माजी महापौर श्रद्धा जाधव यांनी रस्त्याला देखील त्यांचे नाव देता येईल असे सांगितले.





विभागीय आमदार यांनी आपल्या शोकसंदेशात, प्रभादेवीतील चवनी गल्ली क्रीडांगणाकरिता या दृष्टीने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. या बाबत आमदार भाई जगताप यांनी सूचना केली, की प्रथम खेळाची मैदाने वाचविली, तर क्रीडा संकुल तयार करून त्यांना खेळाडूंची नावे देता येथील. ते पुढे असेही म्हणाले की तारकला असे चौक, रस्त्यात अडकवून ठेऊ नका. तर त्याला भारताचा महत्वाचा पुरस्कार मिळवून देण्याकरिता प्रयत्न होणे गरजेचे आहे.

आमदार सुनील शिंदे यांनी त्यांच्या प्रति आदर व्यक्त करताना असे सांगितले की, लोअर परेल येथील मैदानाला मी तारक राऊळ यांचे नाव देऊ शकतो. तसेच त्याला राष्ट्रीय पुरस्कार मिळवून देण्यास मी देखील आपल्या बरोबरीने हिरीरीने प्रयत्न करेन.

तारक राऊळ यांनी बुवा साळवी यांच्या सहकार्याने कबड्डीला सातासमुद्राकडे नेण्याचे महत्वाचे कार्य केले. असे राज्य संघटनेचे माजी सचिव बाबूराव चांदेरे म्हणाले.

प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १०० सामन्यांचा टप्पा; दुलीप ट्रॉफीत रचला इतिहास

# मोहम्मद शमीचा शतकी धमाका

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था|**

चेन्नई येथे सध्या ईस्ट झोन आणि साऊथ झोन यांच्यात दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना सुरू आहे. प्रथम फलंदाजी करत ईस्ट झोनने जोरदार सुरुवात केली आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद शामी देखील ईस्ट झोनकडून खेळत आहे. दुलीप ट्रॉफीमध्ये आतापर्यंत त्याने आपल्या गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले आहे. ईस्ट झोनला अंतिम फेरीत पोहोचवण्यात त्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शामीने आपल्या कारकिर्दीत एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. यासाठी त्याचा सन्मान करण्यात आला.





मोहम्मद शमीची कारकीर्द आतापर्यंत प्रभावी राहिली आहे. त्याने भारतीय संघासाठी चांगली कामगिरी केली आहे. जरी तो बऱ्याच काळापासून संघाचा भाग नसला तरी, तो आपल्या दमदार गोलंदाजीने भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे. शमीने आता १०० प्रथम-श्रेणी सामने पूर्ण केले आहेत. एक प्रकारे, त्याने सामन्यांचे शतक पूर्ण केले आहे. शमीने २०२६ च्या दुलीप ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात एक मोठा टप्पा गाठला. त्याची प्रथम-श्रेणी कारकीर्द देखील आतापर्यंत दमदार राहिली आहे. शामीने १८७ डावांमध्ये ३८२ विकेट्स घेतले आहेत. त्याने १५ डावांमध्ये पाच विकेट्सही घेतले आहेत. याव्यतिरिक्त, त्याने दोन सामन्यांमध्ये १० विकेट्स घेतले आहेत. शमीने नोव्हेंबर २०१० मध्ये प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.या कामगिरीबद्दल बंगाल क्रिकेट असोसिएशनतर्फे मोहम्मद शामीला विशेष सन्मान देण्यात आला. अंतिम सामन्याच्या एक दिवस आधी एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याला बंगालचे अध्यक्ष सौरव गांगुली यांची स्वाक्षरी असलेला क्रिकेट बॉल, १०० क्रमांक असलेली एक विशेष जर्सी आणि एक चांदीचे ताट भेट देण्यात आले. तसेच, केकही कापण्यात आला. ईशान किशन ईस्ट झोनचे कर्णधारपद भूषवत आहे. तो मोहम्मद शामीच्या सत्कार समारंभातही उपस्थित होता. शमी सुमारे दीड वर्षांपासून भारतीय संघापासून दूर आहे. तो शेवटचा भारतासाठी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये खेळला होता. तेव्हापासून त्याच्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. सामन्यापूर्वी, ईशानने शमीबद्दल आपले मत व्यक्त केले. तो म्हणाला की, 'मोहम्मद शमी सर्वोत्कृष्ट खेळाडूंपैकी एक आहे. तो या खेळातील एक महान खेळाडू आहे. त्याची कामगिरी नेहमीच उत्कृष्ट राहिली आहे. तो सातत्याने विकेट्स घेत आहे. शमी आपली सर्व शक्ती पणाला लावत आहे. त्याने भारतीय क्रिकेट संघासाठीही खूप चांगली कामगिरी केली आहे. वयाबद्दल काहीही सांगणे कठीण आहे. माझा विश्वास आहे की वय हा केवळ एक आकडा आहे. जर तो कठोर परिश्रम करत असेल, तर वयाने काही फरक पडत नाही.

# साई किशोरचे ६ धावात ५ बळी

**नवी दिल्ली :** भारतीय फिरकीपटू साई किशोरने शनिवारी (दि.५) काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजनटूमध्येउत्कृष्टगोलंदाजी केली. त्याने ग्लॉस्टरशायरकडून डर्बीशायरविरुद्ध ६ धावांत ५ बळी घेतले. ग्लॉस्टरशायरने हा सामना २१३ धावांनी जिंकला.दिलेल्या सामन्याच्या वर्णनानुसार, किशोरने डर्बीशायरच्या दुसऱ्या डावात हॅरी केम, मॅथ्यू म ॅन्टगोमरी, वेन मॅडसन, एनेरिन डोनाल्ड आणि ब्रुक गेस्ट यांना बाद केले. मॉन्टगोमरी पहिल्याच चेंडूवर आणि गेस्ट दोन चेंडूंवर शून्यावर बाद झाले.किशोरने ८ षटकांपेक्षा कमी षटकांत ६ धावांत ५ बळी घेतले. साम न्यातील त्याची अंतिम गोलंदाजी आकडेवारी १८ षटकांत ५/२० अशी राहिली, ज्यात १२ निर्धाव षटके होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)